रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक ३५ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## मिहीर शाहला १६ जुलैपर्यंत कोठडी

**मुंबई :** वरळीतील हिट अँन्ड रन प्रकरणात मिहीर शाहाला १६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. मंगळवारी त्याला विरार येथून अटक करण्यात आली. बुधवारी शिवडी न्यायालयात हजर केले असता त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. ७ जुलै रोजी वरळीच्या कोळीवाड्यात बीएमडब्ल्यू या अलिशान गाडीने दुचाकीवर असलेल्या एका जोडप्याला उडवलं. या अपघातात दुचाकीवरील पुरुष एका बाजूला जाऊन पडला. तर महिला गाडीच्या बोनेटवर अडकली. तिच्या अंगावरून गाडी गेल्याने तिचा मृत्यू झाला होता.


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ११ जुलै २०२४

किंमत ४ ₹


## मराठवाडा भूकंपाने हादरला

**नांदेड :** हिंगोली, नांदेड आणि परभणी जिल्ह्याला बुधवारी पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के बसले. तिन्ही जिल्हे भूकंपाच्या धक्क्यांनी हादरून गेले आहेत. यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली असून, परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. रिश्टर स्केलवर या भूकंपाची नोंद ४.२ इतकी करण्यात आली आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हिंगोलीमध्ये बुधवारी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास भूकंपाचे तीव्र धक्के बसले.

**आजचा अग्रलेख**
**तिजोरीला आणखी भोके**

### वे|ध|क

## आरक्षणावरील सुनावणी ऑगस्टपर्यंत

**मुंबई :** राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा विषय गाजत आहे. मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याच्या मागणीवर मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. राज्य सरकारने मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय श्रेणीतून दिलेल्या १० टक्के आरक्षणाची कायदेशीर लढाई सुरू आहे. मुंबई उच्च न्यायालयात बुधवारी याबाबत सुनावणी झाली. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकांवर सरकारच्यावतीने राज्य मागास आयोगाकडून बाजू मांडण्यात येत आहे. मात्र, आयोगाचे वकील परदेशात असल्याने सुनावणीसाठी मुदतवाढ मिळावी, अशी मागणी आयोगाकडून करण्यात आली होती. त्यावर, उच्च न्यायालयाने तीन आठवड्यांची मुदतवाढ आयोगाला देण्यात आली आहे.

## मराठा आरक्षणावरून राजकरण पेटले

**मुंबई :** मराठा आरक्षणावरून राजकरण पेटल्याचा प्रत्यय विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात दिसून आला. सरकार बॅकफूट गेले आहे. असे चित्र निर्माण झाले आहे. या मुद्द्यावरून विधानसभेचे कामकाज तब्बल चार वेळा तहकूब करण्यात आले. त्यानंतर विधानसभा आणि विधानपरिषदेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूक करण्यात आले. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी यावर बोलताना आपली भूमिका स्पष्ट केली. मराठा आणि ओबीसी समाजात महायुतीने तेढ निर्माण केले आहे. आरक्षणाचा प्रश्न या सरकारला सोडवायचा नाही. हे आता स्पष्ट झाले आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले.

## टोमॅटोने गाठली शंभरी

**मुंबई :** राज्यात पावसाचे आगमन होताच भाज्यांचे दर गगनाला भिडू लागले आहेत. प्रत्येक वेळी कांदा मोठ्या प्रमाणात महाग होतो. मात्र, सध्या मुसळधार पावसामुळे टोमॅटोने नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. ३० ते ४० रुपये विकला जाणारा टोमॅटो पावसामुळे १०० रुपये किलो विकला जात आहे. यामुळे गृहिणींचं बजेट कोलमडणार असल्याचं म्हटलं जात आहे. मुंबई, नवी मुंबईमध्ये १०० ते १२० रुपये प्रति किलो दराने टोमॅटोची विक्री करण्यात येत आहे. शंभरी पार केलेल्या टॉमेटोमुळे गृहिणींच्या रोजच्या बजेटवर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# महामार्गावर मेगाब्लॉक

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड पुई येथील महिसदरा नदी पात्रावरनवीनपुलाचेगर्डरबसविण्याचे काम होणार असल्याने दि. ११ ते १३ जुलै रोजी सकाळी ६ ते ८ व दुपारी २ ते ४ वाजण्याच्या दरम्यान मेगाब्लॉक घेण्यात येणार असून, सर्व प्रकारची वाहतूक या ठिकाणांहून बंद राहणार आहे. पान २ वर




## वरंध घाट ३१ ऑगस्टपर्यंत बंद

**रायगड :** रायगड जिल्ह्यात गेले काही दिवस अतिमुसळधार पाऊस झाला होता. या पावसात पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या वरंध घाटात दरड कोसळून रस्ता खचला आहे. त्यामुळे वाहतुकीसाठी पान २ वर

- आजपासून सकाळी दोन, दुपारी दोन तास वाहतूक बंद
- कोलाड पुई येथील पुलाला गर्डर बसवणार

### मुंबईहून गोव्याला जाणाऱ्यांसाठी पर्यायी मार्ग

- वाकण फाटा इथून भिसे खिंड–रोहा– कोलाड मार्गे पुन्हा मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ.
- वाकण फाटा इथून पाली–रवाळजे–कोलाड किंवा पाली–रवाळजे–निजामपूर–माणगाववरून वळवून मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ.
- खोपोली–पाली–वाकण राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांना पाली–रवाळजे–कोलाड मार्गे वळवून मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ.

### गोव्याहून मुंबईला जाणाऱ्यांसाठी पर्यायी मार्ग

- कोलाड येथून कालाड–रोहा–भिसे खिंड–वाकण फाटा किंवा नागोठणेवरून वळवून मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ होता येईल.
- कोलाड येथून रवाळजे–पालीवरून वळवून वाकण–पाली–खोपोली राष्ट्रीय महामार्गावरून मार्गस्थ होता येईल.
- कोलाड इथून रवाळजे–पाली–वाकण फाटावरून वळवून मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ होता येईल.



# महागाई भत्त्यात चार टक्क्यांनी वाढ

## निवडणुकीआधी कर्मचाऱ्यांना खुश करण्याचा प्रयत्न

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या आधी राज्य सरकारकडून सरकारी कर्मचाऱ्यांना खुश करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढ आली आहे. १ जानेवारी २०२४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढ लागू केली जाईल.

दिनांक १ जानेवारी २०२४ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४६ टक्क्यांवरुन ५० टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्ता वाढ दिनांक १ जानेवारी २०२४ ते दिनांक ३० जून २०२४ या कालावधीतील थकबाकीसह जुलै २०२४ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी, असा शासन निर्णय जाहीर करण्यात



आला आहे.

दरम्यान, महाराष्ट्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वर्षातून २ वेळा वाढ करण्यात येत असते. १ जानेवारी २०२४ मध्ये महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. ४२ टक्के महागाई भत्ता होता. हा महागाई भत्ता २३ नोव्हेंबर २०२३ मध्ये वाढवण्यात आला. त्यानंतर महागाई भत्ता ४२ टक्क्यांवरुन ४६ टक्के इतका झाला. त्यानंतर आता जुलै २०२४ मध्ये महागाई भत्त्यात वाढ करण्यात आली आहे. आता महागाई भत्ता ४ टक्क्यांनी वाढला आहे, त्यामुळे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५० टक्के इतका झाला आहे.

# स्वाईन फ्लू, झिकाचा धोका

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पुण्यात झिकाचे रुग्ण आणि ठाण्यात स्वाईन फ्लूचे रुग्ण सापडू लागले आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात या आजारांचा प्रादुर्भाव होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वच्छता राखण्याबरोबरच गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.




**नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन**

ठाणे जिल्ह्यात स्वाईन फ्लूचे रुग्ण सापडले आहेत. या विषाणूमुळे ताप, सर्दी, खोकल्यासारखे आजार निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच पुण्यामध्येदेखील झिका आजाराचा प्रादुर्भाव सुरु झाला आहे. डासांमुळे हा आजार होत असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यापासून पुणे व ठाणे हे दोन्ही जिल्हे जवळच आहेत. या जिल्ह्यांतून रायगडमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्याला स्वाईन फ्लूसह झिकाचा धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

जिल्ह्यात या आजाराचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी आरोग्य विभागाकडून जनजागृती सुरु करण्यात आली आहे. स्वाईन फ्लूला रोखण्यासाठी मास्कचा वापर करणे, गर्दीत जाणे टाळणे अशा प्रकारचे आवाहन रुग्णालयांकडून पान २ वर

## विधानपरिषदेसाठी उद्या मतदान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी शुक्रवारी (दि. १२) मतदान होणार असून, १२ उमेदवार रिंगणात असल्याने निवडणुकीत चूरस वाढली आहे. महायुतीकडून पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, डॉ. परीणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत, भावना गवळ, कृपाल तुमाने, राजेश विटेकर, शिवाजी गर्जे, तर महाविकास आघाडीकडून प्रज्ञा सातव, मिलिंद नार्वेकर, जयंत पाटील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या निवडणुकीत एका उमेदवाराला विजयासाठी पहिल्या पसंतीच्या २३ मतांचा कोटा निर्धारीत करण्यात आला आहे. विधानसभेच्या २८८ आमदारांपैकी २७८ आमदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

# कॉरिडोअर प्रकल्प भूसंपादनात गैरव्यवहार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विरार-अलिबाग कॉरिडोअर आणि पुणे रिंग रोड प्रकल्पातील भूसंपादनात गैरव्यवहार झाला आहे. वसई-विरार भूसंपादनातदेखील गैरव्यवहार झाला आहे. या दोन्ही गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करावी, तसेच हा गैरव्हार करणाऱ्या भूसंपादन अधिकाऱ्याची चौकशी करून त्यास तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी (दि. १०) विधानसभेत केली.

विधानसभेत या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी लक्षवेधी मांडली होती. या लक्षवेधीवरील चर्चेवेळी त्यांनी चौकशीची मागणी केली आहे. 'कर्ज काढून घर बांधा' असा नवीन पायंडा महाराष्ट्रात पडत आहे. राज्य शासन कर्ज काढून नवीन प्रकल्प उभारत




आहे. राज्यात पायाभूत सुविधा झाल्या पाहिजेत. परंतु, या पायाभूत सुविधा सरकारला झेपतील तेवढ्याच करण्याची आवश्यकता होती. मात्र, त्यापलीकडे काम सुरू आहे. २०२१ च्या निर्णयानुसार जोपर्यंत जमिनीचे पूर्ण भूसंपादन होत नाही, तोपर्यंत निविदा प्रक्रिया अंतिम करता येत नाही. या निर्णयामुळे नियमांची पायमल्ली केली आहे. उत्तरात मंत्री म्हणाले की, ही निविदा २००९ च्या शासन निर्णयानुसार काढली आहे. २६ हजार ८३१ कोटी रुपयांचे हे काम होते. हे काम दोन वर्षात चाळीस हजार कोटींचे कसे झाले? हे पैसे कुणाच्या खिशात जात आहेत, असा सवाल

### विजय वड्डेटीवारांची चौकशीची मागणी

वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

कॅबिनेट नोटमध्ये वसई विरार ते अलिबाग कॉरिडोअरच्या भूसंपादनासाठी जी कर्जाची मान्यता घेतली त्यात प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी २२ हजार २५० कोटी रुपये हुडकोकडून कर्ज रुपात घेण्यास मान्यता दिली. या कर्जासाठी जी शासन हमी देण्यात आली, त्यात एकूण अकराशे तीस हेक्टर जमिनीचे भूसंपादन करावयाचे होते. २१५.८० हेक्टर जमिनीचे भूसंपादन झाले आणि त्या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी २३४१.७१ कोटी निधी देण्यात आला. एमएमआरडीएकडून एम.एस. डी.सी कडे आले. हे दोन्ही प्रकल्पचे भूसंपादन पान २ वर

# बस-दुधाच्या टँकरचा अपघात

**। उत्तर प्रदेश । वृत्तसंस्था ।**

गेल्या काही दिवसांपासून रस्ते अपघातात प्रचंड प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. त्यातच आता उत्तर प्रदेशात एका स्लीपर डबल डेकर बस आणि दुधाच्या टँकरमध्ये भीषण अपघात झाला आहे. यात १८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर २० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. उत्तर प्रदेशातील बेहता मुजावर परिसरात हा भीषण अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, लखनौ-आग्रा महामार्गावर बुधवारी (दि. १०) पहाटे भीषण अपघात घडला. बिहारमधील सीतामढीहून दिल्लीला जाणाऱ्या एका डबल डेकर बसने दुधाच्या टँकरला भीषण धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की यात बस आणि कंटेनरचाही अक्षरशः चुराडा झाला. उन्नावमधील




बेहता मुजावर पोलीस स्टेशन हद्दीतील गधा गावासमोर हा अपघात घडला. लखनौ-आग्रा महामार्गावर बेहता मुजावर परिसरात असलेल्या उभ्या दुधाच्या कंटेनरला डबलडेकर बसने जोरदार धडक दिली.

या अपघातात १८ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये दोन महिला आणि एका लहान मुलाचा समावेश आहे. तर २० पेक्षा जास्त प्रवाशी गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

या अपघाताची माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यानंतर वेगाने बचावकार्य सुरु करण्यात आले. या अपघातात जखमी झालेल्यांना तातडीने बांगरमौ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आलं आहे.

## घटस्फोटित मुस्लीम महिलेलाही पोटगीचा अधिकार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशात धर्मनिरपेक्ष कायदाच चालेल, असे स्पष्ट करत घटस्फोटित मुस्लिम महिला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ अंतर्गत पोटगी मागू शकते, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बीबी नागरथना आणि न्यायमूर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांच्या खंडपीठाने बुधवारी (दि.१०) दिला. अब्दुल समद याने तेलंगणा उच्च न्यायालयाच्या आपल्या पत्नीला भरणपोषण भत्ता देण्याच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

# दिव्यांग मुलांच्या शाळेला गळती

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपारिषदेने दिव्यांग मुलांसाठी बांधलेल्या शाळेच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर नवे बांधकाम करण्यासाठी मशीनरी वापरून ठोकाठोकी केल्यामुळे



स्लॅब, भिंतींना तडे गेले आहेत. पावसाळ्यात स्लॅब गळत असून, सर्वच वर्गखोल्यांमध्ये पाणी साठल्यामुळे बेंच, शाळेच्या वस्तुंचे मोठे नुकसान झाले. छताखालील पीओपी पडल्यामुळे पान २ वर


## राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्था

संचलित

## नर्सिंग कोर्स प्रवेश देणे सुरू

मोफत प्रवेश*

| संस्था | अभ्यासक्रम | पात्रता | संपर्क |
| --- | --- | --- | --- |
| रायगड इंस्टीट्युट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, MH CET CODE - 9416, MUHS CODE - 151146, मु.नांदगाव, ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड | B.Sc Nursing ०४ वर्ष | १२ वी सायन्स MH-Bsc Nursing CET | ७७७४८५०५४५, ९९२०२६१०१७, Mail Id raigadine@gmail.com web : www.raigadine.co.in |
| | GNM ३ वर्ष– | १२ वी पास कोणतीही शाखा | |
| ओम कॉलेज ऑफ नर्सिंग, MSBNPE CODE - 1257, मु.पो. लाडवली ता. महाड, जि.रायगड | GNM ३ वर्ष | | ७०८३६९७९९४, ९८११०७११९८, Mail Id omconmahad@gmail.com web : www.omcon.co.in |
| नुतन स्कुल ऑफ नर्सिंग, MSBNPE CODE - 0016, मु.नांदगांव, ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड | ANM २ वर्ष / GNM ३ वर्ष | | ९५४५९८९८३६, ९२७०२०९५२०, Mail Id nootannursing@gmail.com web : www.nootannursing.in |

शैक्षणिक कर्ज व शिष्यवृत्तीची सोय

१००% नोकरीची संधी

*अटी लागू

सर्व संस्था भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली, महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यकीय शिक्षण मंडळ मुंबई, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक आणि महाराष्ट्र राज्य मान्यताप्राप्त


## जून तिमाहीत पूर्ण केला ५७५० कोटींचा टप्पा

# आरडीसीसीची 6 हजार कोटींच्या व्यवसायाकडे वाटचाल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील पहिल्या तिमाहीचे आपल्या सांपत्तिक स्थितीचे आकडे जाहिर करताना मागील आर्थिक वर्षाप्रमाणेच सातत्यपूर्ण घोडदौड सुरू ठेवली आहे. जून २०२४ अखेर बँकेने ५७५० कोटींचा व्यवसाय टप्पा पार केला असून, बँक लवकरच ६००० कोटींचा टप्पा पूर्ण करेल, असा विश्वास बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी व्यक्त केला.

- आर्थिक वर्षात २५000 पेक्षा अधिक नवीन ग्राहक जोडले
- सीकेवायसीचे काम पूर्ण केले

सातत्यपूर्ण कामगिरी, सहकारातील प्रभावी धोरण आणि तंत्रज्ञान स्नेही म्हणून बँकेने वेळोवेळी केलेले बदल यामुळे बँकेने हा यशस्वी टप्पा पूर्ण केला आहे. राज्यातील सहकार क्षेत्रातील उच्चपदस्थ अधिकारी तसेच नाबार्डने बँकेच्या या कामगिरीचे कौतुक केलेले असून, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे संगणकीकरण, बँकेच्या सेवांमध्ये सातत्याने आधुनिकीकरण आणि त्यांच्यासमवेत सांपत्तिक स्थितीमधील भरीव कामगिरी, संचालक मंडळाचे उपयुक्त मार्गदर्शन आणि प्रभावी व्यवस्थापन याबद्दल बँकेचे अभिनंदन केले आहे.

बँकेचे चेअरमन आमदार जयंत पाटील यांनी पान २ वर

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील शेती आणि शेती आधारित पूरक व्यवसायांना कर्जपुरवठा करीत असून, त्याच्यासमवेत व्यवसाय आणि उद्योजकांना कर्जपुरवठा करीत असल्यामुळे जिल्ह्यातील अनेक ग्राहकांचे बँकेशी तत्परतेचे नाते तयार झाले आहे.



पान १ वरून

## महामार्गावर मेगाब्लॉक

या मार्गावर धावणाऱ्या वाहनांसाठी पर्यायी मार्ग देण्यात आले असून, त्याचा वापर वाहन चालक यांनी करण्याचे आवाहन पोलीस विभागाने केले आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर कल्याण टोल इन्फा. कंपनीतर्फे पुई येथील म्हैसदरा नवीन ब्रिजचे गर्डर बसविण्याचे काम दि. ११ ते १३ जुलै रोजी सकाळी ६ ते ८ व दुपारी २ ते ४ दरम्यान करण्यात येणार आहे. त्यामुळे नियोजित कामाच्या वेळी मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्गावरील सर्व प्रकारची वाहने (हलकी व जड-अवजड वाहने) यांची वाहतूक बंद करण्यात येणार आहे. ही वाहतूक कोलाड-रोहा भिसे खिंड मार्गे नागोठणे पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

दुसरा पर्यायी मार्ग वाकण फाटा येथून पाली-रवाळजे कोलाड किंवा पाली रवाळजे-निजामपूर-माणगाववरून वळवून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ या मार्गावरून मार्गस्थ करता येणार आहे, असे अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक) शाखेचे पोलीस अधीक्षक यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

## वरंध घाट ३१ ऑगस्टपर्यंत बंद

अत्यंत धोकादायक बनला आहे. याची दखल घेत रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मार्ग बंद करण्याची अधिसूचना करण्यात आली आहे. ३१ ऑगस्टपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी मार्ग बंद करण्यात आला आहे.

पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यास दरड कोसळणे, झाडे पडणे, रस्ता खचणे, माती वाहून जाणे अशा प्रकारच्या घटना घडल्याने जीवित व वित्तहानी होण्याच्या घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. सद्य:स्थितीत वरंध घाटातून प्रवास करणाऱ्या तसेच मालाची ने-आण करणाऱ्या वाहनांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग ३१ ऑगस्टपर्यंत वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी तशी अधिसूचना जारी केली आहे. प्रवासी आणि पर्यटकांनी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

त्यानुसार नागरिकांनी पुण्याकडे जाण्यासाठी महाड-माणगांव-निजामपूर-ताम्हिणी घाट-मुळशी-पिरंगुट-पुणे असा मार्ग वापरावा तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर-खेड-चिपळूण-पाटण-कराड-कोल्हापूर असा मार्ग वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या वाहतुकीकरिता बंद करण्याबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण आणि पोलीस अधीक्षक रायगड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली होती.

## स्वाईन फ्लू, झिकाचा धोका

करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, रोगप्रतिकार शक्ती कमी असलेल्या व्यक्तींसह वयोवृद्धांना स्वाईन फ्लूचा धोका असून, प्रत्येकाने आरोग्याची काळजी घेणे, आजारी व्यक्तीने गर्दीच्या ठिकाणी जाऊ नये, लक्षणे दिसून आल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी याबाबत काळजी घ्यावी, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी सांगितले आहे. तसेच झिका हा आजार डासांमुळे होण्याची भीती आहे. त्यामुळे नागरिकांनी मच्छरांची पैदास वाढू नये यासाठी उपाययोजना करणे, सखल भागात पाणी साचवून न देणे अशा अनेक प्रकारचे उपाय करण्यात यावेत, असे सांगण्यात आले आहे.

## आरडीसीसीची ६००० कोटींच्या व्यवसायाकडे वाटचाल

याबाबत समाधान व्यक्त करताना रायगड जिल्ह्यातील ग्राहकांनी बँकेवरती दाखविलेला विश्वास आणि बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे यांच्यासह सर्व संचालक मंडळ हे एकमताने बँकेच्या उन्नतीसाठी काम करीत असल्याने हा प्रगतीचा आलेख उंचावण्यास मदत होत आहे, याबद्दल आभार व्यक्त केले.

बँकेने या आर्थिक वर्षात २५००० पेक्षा अधिक नवीन ग्राहक जोडले आहेत, यूपीआय, आयएमपीएस, स्टेटमेंट ऑन ई-मेल, क्युआर कोड यासारख्या आधुनिक सेवांसोबत ग्राहकांना लघुउद्योगासाठी तात्काळ कर्जसुविधा याद्वारे बँकेने आपला विस्तार वाढविला आहे. शिवाय, बँकेने या आर्थिक वर्षात सीकेवायसीचे काम पूर्ण केलेले असून, यामुळे देशभरातील कोणत्याही बँकेत व्यवहार करण्यास रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ग्राहकाला एकच ग्राहक क्रमांक उपलब्ध होणार आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची शून्य रकमेने हजारो खाती बँकेने सुरू केलेली असून, त्याला चांगला प्रतिसाद ग्राहकांचा लाभत आहे, त्याबद्दलदेखील बँकेच्या अध्यक्षांनी ग्राहकांचे आभार मानले आहेत.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील शेती आणि शेती आधारित पूरक व्यवसायांना कर्जपुरवठा करीत असून, त्याच्यासमवेत व्यवसाय आणि उद्योजकांना कर्जपुरवठा करीत असल्यामुळे जिल्ह्यातील अनेक ग्राहकांचे बँकेशी तत्परतेचे नाते तयार झाले आहे. बँकेने मागील आर्थिक वर्षात ७३ कोटी इतका ढोबळ नफा कमविला असून, गृहनिर्माण सहकारी संस्था, पगारदार सहकारी संस्था, जिल्ह्यातील पतपेढ्या, अर्बन बँका, या जिल्हा सहकारी बँकेशी जोडल्यामुळे सहकारातून सहकाराची वृद्धी हे आजवर बँकेचे चेअरमन आमदार जयंत पाटील यांनी जपलेले धोरण आम्ही यशस्वीरित्या पुढे नेत आहोत आणि त्यामध्ये बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी बँकेच्या ग्राहकांशी आपुलकीचे नाते जपत आहेत, याबद्दल बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी समाधान व्यक्त करत बँकेचे ठेवीदार, सभासद, कर्जदार आणि हितचिंतक यांच्यासह बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या योगदानाबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले आणि ६००० कोटींच्या व्यवसाय टप्पा पूर्ण करण्यासाठी बँकेतील प्रत्येक कर्मचारी आणि अधिकारी सिद्ध असल्याचे जाहीर केले.

## विरार-अलिबाग कॉरिडोअर प्रकल्प भूसंपादनात गैरव्यवहार

केल्याशिवाय कामाची निविदा काढू नये. या निविदा का काढण्यात आल्या त्याचे उत्तर द्यावे. या निविदा काढत असताना यात शंभर टक्के भूसंपादन होणार नाही यात खूप अडथळे आहेत. तरी पण निविदा काढून सरकार अधिकारी कमिशन घेऊन मोकळे झाले. सदर भूसंपादनामध्ये मुळशी पॅटर्नसारखी परिस्थिती होईल.

वसई विरार भूसंपादनाचा झालेल्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करावी. प्रांत अधिकाऱ्याने किमान दोनशे कोटी रुपये या सगळ्या प्रकरणात वसूल केले आहेत. ज्या जागा जिरायत नव्हत्या, त्या जिरायत दाखवल्या. प्रांत अधिकाऱ्यावर किती दिवसात कारवाई करणार, असा सवाल श्री. वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. हुडकोकडून कर्ज घेण्याची घाई का केली. उर्वरित भूसंपादन किती कालावधीत करणार. हे करत असताना भूसंपादन अधिकाऱ्याची चौकशी करून त्याला निलंबित करा, अशी मागणी वडेट्टीवार यांनी सभागृहात केली आहे.

## दिव्यांग मुलांच्या शाळेला गळती

मोठी दुर्घटना घडली नाही, तर भविष्यात स्लॅब कोसळून दुर्घटना होण्यापेक्षा शाळेची दुरूस्ती होईपर्यंत मुलांना शाळेत पाठविणार नसल्याचा निर्णय पालकांनी घेतला आहे. प्रत्येक मुलांना त्यांच्या हक्काचे शिक्षण घेण्याचा अधिकार असतानाही दिव्यांग शाळांमधील विद्यार्थ्यांची दुरवस्था पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

शालोम एज्युकेशन सेंटर संचालित सोफिया दिव्यांग मुलांच्या शाळेला खोपोली नगरपरिषदेने दिव्यांग भवन विरेश्वर मंदिरसमोरील वरची खोपोली येथे बांधून दिले आहे. इमारत बांधल्यापासून कोणतीही दुरवस्था नव्हती. काही दिवसांपासून इमारतीवर दुसरा स्लॅब टाकण्याचे काम सुरू केले आहे. ठोकाठोकीमुळे तडे गेले आहेत. तर, ठेकेदार शाळेतील मीटरवरून कामासाठी वीज वापरत असल्याने अतिवापर केल्यामुळे शाळेची लाईट बंद असते. यासंबंधीची माहिती नगरपरिषदेला निवेदन पत्राद्वारे कळवूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याचा आरोप होत आहे. वर्गखोल्यांमध्ये पीओपी कोसळले असून, इलेक्ट्रिकच्या वायर तुटल्या आहेत. सर्व खोल्यांमध्ये पाणी साठले होते. दिव्यांग मुलांच्या शाळेची दुरवस्था झाल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी माजी नगरसेवक किशोर पानसरे, माजी नगरसेविका जिनी सॅम्युअल, सामाजिक कार्यकर्ते शयाम कांबळे, विजय तेंडुलकर पोहोचले. त्यांनी शाळेची दुरवस्था पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले होते. त्यानंतर बांधकाम अभियंता अनिल वाणी, अविनाश गायकवाड यांना पालकांनी चांगलच सुनावलं.

अनेक अडीअडचणींवर मात करून दिव्यांग मुलांसाठी नगरपरिषदेने भव्य शाळा बांधली आहे. शाळा सुरू झाल्यापासून कोणतीही अडचण आली नव्हती. मात्र, वरच्या मजल्यावर शाळेचे काम सुरू झाल्यापासून इमारत गळत आहे. याबाबत नगरपालिकेत पत्रव्यवहार करूनही दुर्लक्ष केल्याचा आरोप शाळेच्या मुख्याध्यापिका सुभा पाटणकर यांनी केला आहे. दिव्यांग मुलांना आपल्यासारखे समजत नसल्यामुळे ते आपल्यासारखे वावरत नाही. भविष्यात स्लॅब कोसळून दुर्घटना होण्यापेक्षा शाळेची दुरूस्ती होईपर्यंत मुलांना शाळेत पाठविणार नसल्याचे पालकांनी सांगितले आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**११ जुलै**

१) श्रीम.मालती वासुदेव दांडेकर ११-०७-१९४२, अलिबाग
२) श्रीम.रंजना रमेश कारिया ११-०७-१९४६, कामतआळी, अलिबाग
३)श्री.रमेश शंकर वर्तक ११-०७-१९४६, वरसोली, अलिबाग
४)श्री.गोपाळ धोंडू पाडावे, ११-०७-१९४९ रामनाथ, अलिबाग

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली स्थावर मिळकत श्रीमती विनोदिनी विलास तेंडुलकर यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीची मिळकत असून सदरची मिळकत आमचे अशिलांनी त्यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ९७५ओ, बिनशेती प्लॉट क्षेत्र ६३८.८० चौ.मी. या प्लॉट वर बांधण्यात आलेल्या 'तारांगण को-ऑप. हौसींग सोसायटी मर्यादित अलिबाग' मधील चित्रा इमारतीमधील ए विंग मधील उंचावलेल्या तळमजल्यावरील निवासी सदनिका क्र. ००१, क्षेत्र ५८५ चौ. फुट बिल्टअप (५४.३७ चौ.मी.), अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ALB000001505, जुना मालमत्ता क्रमांक Z1MKT001507, मॅन्युअल मालमत्ता क्रमांक 1237 A विंग ही मिळकत.

वर नमुद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहीवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमुद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमुद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरुपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन तसेच सदर मिळकतीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- १०.०७.२०२४

**ॲड. जयवंत ह. घरत**
एम.ए., एल एल.एम.
बी/१०२, 'चित्रा - तारांगण' महर्षी कर्वे रोड,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे तिवरे, ता- कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक मनिषा प्रकाश चव्हाण यांनी आमचे अशिलास कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १६ | १ | ०.४०.०० पैकी ०.२४.०० | ३.५४ |

सबब वर वर्णन केलेल्या क्षेत्राच्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह हरकत दाखल करावी, वरील देण्यात आलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे आशिल हे जबाबदार राहणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

दिनांक ११/०७/२०२४

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बी कॉम. एल.एल.बी.)
पत्ता साई सावली अपार्टमेन्ट गाळा नंबर ०५, दिवाणी कोर्टासमोर कर्जत
ता. कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. रमेश दत्तात्रेय पाटील, २) श्री. पुष्कर सुरेश पाटील, ३) श्रीमती. विजया सुरेश पाटील, ४) श्रीमती. पंकजा रविंद्रनाथ घरत, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मापगांव | २२७ | ०-४८-७० | ११.१५ |
| | | पो. ख. ०-०७-३० | |
| | | एकूण ०-५६-०० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ११/०७/२०२४

सही/-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर.**
सी - ३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

वादीचे वकिल ॲड. आर. बी. कोसमकर

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. सि.ज.सि.डि. यांचे कोर्टात**

रे.मु.क्र.१३३/२०२०

दामोदर पाटील — वादी
विरुध्द
चंद्रकांत घरत — प्रतिवादी

प्रति,
श्री. चंद्रकांत राघव घरत
रा. मु. गोठेघर, पो. कामार्ले
ता. अलिबाग, जि. रायगड
यांसी,

वादी यांनी सि. ज. ज्यु. डी. यांचे न्यायालयात रे.मु.क्र. १३३/२०२० हा दावा न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे काम वर नमुद प्रतिवादी यांना सदर दाव्याच्याकामी हजर होण्यासाठी या न्यायालयाने नोटीस काढली असता नोटीसची बजावणी अद्याप होत नाही म्हणून मे. न्यायालयाने निशाणी २२ वरील आदेशानुसार नोटीसची बजावणी ''दैनिक कृषीवल'' रायगड आवृत्ती या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करण्याची परवानगी दिलेली आहे.

तरी या नोटीसद्वारे सदर वर उल्लेख प्रतिवादी यांना असे कळविण्यात येते की ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आपण स्वतः अगर वकिलांमार्फत दिनांक १५/०७/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता वर नमूद मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्याविरुद्ध एकतर्फी हुकूम होईल व या अर्जाचे कामकाज पुढे चालू राहील.

सदरची जाहीर नोटीस आज दि. ९/०७/२०२४ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

सही/-
कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग-रायगड
अधिक्षक, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग-रायगड

### महाराष्ट्र शासन
### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :- mahad.ee@mahapwd.com ph. No. (०२१४५) २२२१६७

**निविदा सूचना क्रमांक ०३ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १०४९९८५ | रावतळी मानेचीधार येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र बांधणे तालुका महाड, जिल्हा रायगड (कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४) | ८७४२५१२ | ८८००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १०४९९८७ | मोरेवाडी शिंगरकोंड येथे बहुद्देशीय निवारा केंद्र बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४) | ८७४२५१२ | ८८००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १०४९९८८ | आंबेनळी आंबेशिवथर येथे बहुद्देशीय निवारा केंद्र बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४) | ८७१५१४२ | ८७००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १०४९९८९ | पातरेवाडी (आंबिवली बु.) येथे बहुद्देशीय निवारा केंद्र बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४) | ८६५७८२९ | ८७००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १०४९९९० | वरंध (बौद्धावाडी) येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४) | ६०००७२७ | ६१००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १०४९९९१ | कोंडीवते मुळ गावठान येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४) | ५९२४५९२ | ६०००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १०४९९९२ | कोथेरी जंगमवाडी येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४) | ५९३९६०७ | ६०००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| १०४९९९३ | रूपवली येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४) | ७२१८५३१ | ७३००० | ११८०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. १०/०७/२०२४ (सकाळी १०.०० पासून) ते दि. १८/०६/२०२३ वेळ १८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां) विभाग महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक २२/०७/२०२४ वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३२१५
दिनांक :- ०९-०७-२०२४

सही/-
**(एम.आर.नामदे)**
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

### सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजने अंतर्गत वाटप करण्यांत आलेल्या **मौजे –ओवळे** निवाडा **युनिट क्रमांक १४७** मधील स.नं. १४५/३, १४५/७, १४६/२, १४६/५,१४७/२सी, १६३/५, ३८/७+१, ७ क्षेत्र–२६०० चौ.मी. या संपादित जमिनचे खातेदार **श्री. नामदेव द्वारकानाथ गायकवाड** यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पक नोड येथील **भूखंड क्र. २, सेक्टर–७, क्षेत्र–२६०० चौ.मी.** चे **संचिका क्र. १४७** ओवळे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

आता खातेदार **श्री. नामदेव द्वारकानाथ गायकवाड** यांनी त्यांचा वाटपित झालेला पुष्पक नोड येथील **भूखंड क्र. २, सेक्टर–७, क्षेत्र–२६०० चौ.मी.** या भूखंडाबाबत या हक्कसोड सादर केले आहे.

दुय्यम निबंधक **पनवेल–३ नोंदणी क्रमांक– पवल३–७५५०–२०२४, पावती क्र. ८८८८, दिनांक २४.०४.२०२४** यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असून सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपित झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत. :–

उक्त दुय्यम निबंधक पनवेल येथील नोंदणीकृत विनामोबदला हक्कसोडपत्रामध्ये नमूद केल्यानुसार खालील त्यांना वाटप झालेल्या भूखंडाचे हक्क या खातेदारांच्या लाभात सोडले आहेत ते खातेदार पुढील प्रमाणे:–

| अ. क्र. | वारस दाखल्यानुसार हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार (ii) |
|---|---|---|
| १. | महादुबाई द्वारकानाथ गायकवाड | नामदेव द्वारकानाथ गायकवाड |
| २. | बानुबाई चांगदेव म्हात्रे | आत्माराम द्वारकानाथ गायकवाड |
| ३. | लीला हरिभाऊ नाईक | विष्णू द्वारकानाथ गायकवाड |
| ४. | | चंद्रकांत द्वारकानाथ गायकवाड |

उपरोक्त हक्कसोडपत्रानुसार केवळ टेबल क्र. (ii) मध्ये नमुद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत अशा व्यक्तींच्या नांवे सिडकोकडून भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करून भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) तळमजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यांत येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०७८/२०२४–२५


## रायगड जिल्ह्यातील एकमेव शासन मान्यताप्राप्त नर्सिंग मधील पदवी महाविद्यालय : डॉ. माळी

महाड:- ए. एन. एम. (ANM), . एन. एम. (GNM) व बी. एस्सी नर्सिंग (B. Sc Nursing) हे अभ्यासक्रम १०० टक्के रोजगार देणारे आहेत. या अभ्यासक्रमांना आर्थिक दुर्बल घटकतील विद्यार्थी अधिक प्रमाणात प्रवेश घेत असतात. तसेच या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणारे विद्यार्थी गरीब आणि शेतकरी कुटुंबातील असतात त्यामुळे त्यांना या अभ्यासक्रमांची फी भरणे शक्य नसल्याने रोजगार देणाऱ्या अभ्यासक्रमपासून वंचित राहावे लागते. परंतु आता नर्सिंग अभ्यासक्रमांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या घटकांतील विद्यार्थ्यांच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व परीक्षा शुल्क, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता यांकरिता महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे.

या शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे तसेच या शिष्यवृत्तीच्या मदतीमुळे ग्रामीण भागातील सर्व गरजू विद्यार्थ्यांना नर्सिंग करिअरमध्ये भवितव्य घडवण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्था ही एक रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ट संस्था आहे. तसेच नर्सिंग क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत म्हणून आवडीनुसार करिअर निवडा असे आवाहन संस्थेचे सचिव डॉ. रामलिंग माळी यांनी केले आहे.

सध्याचे वातावरण आणि रोगराईचे प्रमाण पाहता या क्षेत्रात प्रचंड मोठ्या संधी आहे. करोना काळात या सगळ्याचे महत्व आपण जाणलेच. त्यामुळे नर्सिंग हे अनेक मोठ्या संधींनी भरलेले क्षेत्र आहे. ज्यामध्ये सरकारी, निम सरकारी किंवा खासगी रुग्णालये, नर्सिंग होम यामध्ये तुम्ही नोकरी करू शकता. याशिवाय सरकारी आस्थापना, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, आरोग्य गृह अशा ठिकाणीही परिचर आणि परिचारिका यांना उत्तम संधी असते. सध्या या क्षेत्रात वेतनही भरपूर दिले जात आहे. एवढेच नव्हे तर परदेशातही संधी उपलब्ध आहेत.

राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्थेचे रायगड इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन मुरुड-जंजिरा हे रायगडमधील एकमेव नर्सिंग मधील पदवी महाविद्यालय आहे व या महाविद्यालयामध्ये मध्ये जी. एन. एम. (GNM) ३ वर्षे व बी. एस्सी नर्सिंग (B. Sc Nursing) ०४ वर्षे असे दोन्ही शासन मान्यताप्राप्त अभ्यासक्रम सुरू आहेत. तसेच या संस्थेचे नूतन स्कूल ऑफ नर्सिंग नांदगाव येथे महाविद्यालय असून येथे ए. एन. एम. (ANM) ०२ वर्षे व जी. एन. एम. (GNM) ३ वर्षे हे दोन्ही अभ्यासक्रम सुरू आहेत. त्याचप्रमाणे ओम कॉलेज ऑफ नर्सिंग महाड येथे जी. एन. एम. (GNM) ३ वर्षे हा अभ्यासक्रम सुरू आहे. सदर अभ्यासक्रमाला शासन शिष्यवृत्ती देत असल्यामुळे मोफत प्रवेशाची संधी आहे. त्याचप्रमाणे नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांचे किमान वय १७ वर्षे असावे तर कमाल वयाची अट नाही.

नर्सिंग अभ्यासक्रम हे आरोग्यसेवा व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे आणि त्याची कायदेशीर चौकट ही व्यवसायाला आकार देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु काही बनावट नर्सिंग कोर्सेस आणि प्रमाणपत्रे देणाऱ्या अनधिकृत संस्थां रायगड व महाराष्ट्रामध्ये आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे करिअर धोक्यात येते. या बनावट नर्सिंग संस्था अपरिचित किंवा मान्यता नसलेले अभ्यासक्रम, अयोग्य प्राध्यापक, पायाभूत सुविधा आणि उपकरणांचा अभाव, अत्याधिक शुल्क व प्लेसमेंट आणि परवाना देण्याची खोटी आश्वासने देऊन विद्यार्थ्यांची फसवणूक करत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रवेश घेत असताना शासन मान्यताप्राप्त संस्थेमध्येच प्रवेश घ्या असा महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यकीय मंडळ मुंबईने विद्यार्थी आणि पालकांना राज्यात कार्यरत असलेल्या फसव्या नर्सिंग संस्थांपासून सावध राहण्याचा इशारा दिला आहे.

नर्सिंग क्षेत्रामध्ये भवितव्य घडविण्यासाठी आजच आपला प्रवेश शासन मान्यताप्राप्त संस्थेमध्ये खाली दिलेल्या नंबरवर फोन करून निश्चित करा.

**रायगड इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन (MUHS Code – १५११४६)**, मुरुड-जंजिरा, अलिबाग, रायगड ४०२ ४०१
मो. ९९२०२६१०१७, ९८१९०७११९८, ७७७४८५०५४५.

Website: - raigadine.co.in Email ID: - raigadine@gmail.com Instagram/Facebook ID: - rinebsc.nursing **ADVT**

निवडक

### तुर्भेमध्ये शाळेत चोरी

**पनवेल :** तुर्भे सेक्टर २० येथील सामंत विद्यालयात चोरी झाली असून प्राथमिक विभागातील कार्यालयात घुसून चोरट्याने ९० हजार ३०० रुपयांची रोकड चोरी केली आहे. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. शाळेच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शाळेला टाळा लावला होता, मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी आल्यावर कार्यालयाच्या दरवाजाचे कुलूप कडी कोयंड्यासहित तोडलेले आढळून आले. आत पाहणी केली असता रोकड चोरल्याचे लक्षात आले.

### पाणी जपून वापरण्याचा सल्ला

**पनवेल :** सिडको वसाहतींमध्ये घर खरेदी केलेले घरमालक सध्या पावसाळ्यातील अतिवृष्टीमुळे पुरसदृश्य स्थितीला सामोरे करत आहेत. त्याचसोबत या घरमालकांना बुधवार ते गुरुवार पर्यंत पाणी पुरवठा बंद राहणार असल्याने पाणी संकटाला सामोरे जावे लागणार आहे. सिडको मंडळाने कळंबोली, काळुंद्रे, करंजाडे आणि नवीन पनवेल या वसाहतींमध्ये पाणी पुरवठा बुधवार ते गुरुवारपर्यंत बंद राहणार असून काटकसरीने पाणी वापरण्याचा सल्ला नागरिकांना दिला आहे.

### मॉर्निंग वॉक ग्रुपतर्फे सत्कार

**अलिबाग :** मॉर्निंग वॉक ग्रुप, आंबेपूर-पेझारीतर्फे या ग्रुपचे अध्यक्ष, कोकणभूषण प्रकाश नागू म्हात्रे यांच्या सकल्पनेतून ज्येष्ठांचा सन्मान केला जातो. त्यांच्याच हस्ते निर्मला नारायण पाटील यांचा पुष्पगुच्छ, मानपत्र, शाल, साडी देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपाध्यक्ष अनिल पाटील, सचिव जी.सी. पाटील, विकास पाटील, नितीन पाटील, रामचंद्र म्हात्रे, सुनील राऊत, सुरेश पाटील, वैकुंठ पाटील, पांडुरंग पाटील आदी मॉर्निंग वॉक ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

### मोरबे धरणात पाऊस बरसला

**नवी मुंबई :** नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरण परिसरात पावसाने ओढ दिल्यामुळे पाणी कपातीचे संकट ओढवले आहे. मोरबे धरणात एकूण ७७४.६० मिमी. पावसाची नोंद झाली आहे . धरण परिसरात थोड्याफार प्रमाणात पाऊस पडत असला तरी अजूनही पावसाचा जोर कमीच आहे. परंतु मागील २४ तासांत रविवारी सकाळी साडेआठ वाजेपर्यंत एका दिवसात १२३ मिमी. पावसाची नोंद झाली आहे. २० जूनला ११७.४० मिमी पावसाची नोंद झाली होती.

### अधिकाऱ्याची फसवणूक

**पनवेल :** बँक खात्याची कुठलीही माहिती कोणालाही दिलेली नसताना ओटीपी येईल असा कुठलाही व्यवहार केला नसतानाही एका निवृत्त अधिकाऱ्याच्या बँक खात्यातील १ लाख ३५ हजार २१ रुपये अनोळखी व्यक्तीच्या खात्यात वळते झाले आहेत. या प्रकरणी एनआरआय पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्ती विरोधात माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत फसवणूक केली म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जॉईस अलेक्स असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

# मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील मुलींना शिक्षणात प्रोत्साहनदेण्यासाठीराज्यसरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मोफत शिक्षण योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार वार्षिक आठ लाख रुपये किंवा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. मात्र, ही योजना केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच लागू असून, कला, वाणिज्य, विज्ञान आदी पारंपरिक शाखांतील अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळू शकणार नाही.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचाशासननिर्णयप्रसिद्धकेला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग, कृषी व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या अखत्यारितील शिक्षण संस्थांमध्ये राबवल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग (ओबीसी), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (एसईबीसी) वार्षिक कौटुंबिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो. व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्यासाठी, मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी मिळण्यासाठी, महिला सक्षमीकरणाअंतर्गत आर्थिक पाठबळाऐवजी, मुली व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून वंचित राहू नयेत यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या ५ जुलै रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता.

**ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत लाभ लागू करताना ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राऐवजी आई-वडीलांच्या एकत्रित उत्पन्नावर आधारित उत्पन्न प्रमाणपत्र लागू करण्यात आले आहे. जे विद्यार्थी नोकरीत असतील त्यांच्या आई-वडिलांच्या उत्पन्नासोबतच उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांचेही उत्पन्न विचारात घेतले जाणार आहे.**

**ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षासाठी मिळाल्यानंतर ही सवलत अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लागू राहील. दुसऱ्या वर्षापासून उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. याच तरतुदी संस्थात्मक आणि संस्थाबाह्य वर्गवारीत समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले, मुली यांनाही लागू आहेत.**



त्यानुसार, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे, सार्वजनिक विद्यापीठांच्या उपकेंद्रांतील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासनाच्या सक्षम प्राधिकरणाद्वारे राबवल्या जाणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे ओबीसी, ईडब्ल्यूएस, एसईबीसी प्रवर्गातील वार्षिक आठ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी कौटुंबिक उत्पन्न असलेल्या नवीन प्रवेशित आणि पूर्वीपासून प्रवेशित मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी ही योजना लागू राहील. त्यात शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून देण्यासाठी ९०६ कोटी रुपयांच्या अतिरिक्त आर्थिक भारास मान्यता देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, महिला आणि बालविकास विभागाने स्पष्ट केलेल्या संस्थात्मक, संस्थाबाह्य या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणारी अनाथ मुले, मुली यांनाही या योजनेचा लाभ लागू करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण ही योजना लागू करताना खासगी विद्यापीठ आणि स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठात शिकणाऱ्या मुलींना या योजनेचा लाभ मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच ही योजना केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच लागू आहे. त्यामुळे पारंपरिक कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांतील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळणार नसल्याचे दिसून येत आहे.

# पाच्छापूर रस्त्याची अवस्था बिकट



**। पाली । वार्ताहर ।**

- ठेकेदाराची उपाययोजना ठरते कुचकामी
- वारंवार पर्यटक, ग्रामस्थांची वाहने चिखलात

तालुक्यातील पाच्छापूर ते दर्यागाव या रस्त्याची प्रचंड दुर्दशा झाली आहे. त्यातच पाऊस पडल्यामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले असून राडारोडा झाला आहे. यातून ग्रामस्थांना, पर्यटकांना जिकरीचा प्रवास करावा लागत असून पर्यटक व ग्रामस्थांची वाहने चिखलामध्ये वारंवार फसली जात आहेत. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून पावसाची संततधार चालू आहे व यातच अपूर्ण असलेला पाच्छापूर ते दर्यागाव रस्ता त्यामुळे रस्त्यावर चिखलाचा राडारोडा झाला असून त्या चिखलात सुधागड किल्ल्यावर येणारे पर्यटक व स्थानिक नागरिकांची वाहतुकीसाठी असणारी वाहने ही चिखलात फसत आहेत. दरम्यान नागरिकांच्या मागणीवरून उपाययोजना म्हणून चिखल असलेल्या रस्त्यावर ठेकेदाराकडून जेऐसबी मटेरियल टाकण्यात आले परंतु ती उपाययोजना फोल ठरली किंबहुना त्याकरिता आलेले डंपर हेच त्या चिखलात फसले होते. त्यामुळे पर्यटक व नागरिकांना बराच वेळ ताटकळत रहावे लागले.

यावाबत स्थानिकांनी याआधी सुधागड तालुका तहसीलदार यांना निवेदन दिले होते मात्र तरीसुद्धा प्रशासनाकडून योग्य ती उपाययोजना करण्यात आली नाही. जुलै ते सप्टेंबर या महिन्यात पावसाचे प्रमाण खूप असते त्यामुळे अशा पावसात तर नागरिकांना घराबाहेरदेखील पडणे कठीण होईल.परिणामी शाळकरी विद्यार्थी यांचे शैक्षणिक नुकसान होईल तर नोकरदार,आबालवृद्ध, आजारी व्यक्ती यांना देखील अनेक अडचणींना सामोरं जावं लागेल. त्यामुळे नागरिकांना यापुढे होणाऱ्या त्रासाला जबाबदार कोण? ठेकेदाराच्या हालगर्जीपणाचा परिणाम नागरिकांना सोसावा लागणार? सुधागड तालुका प्रशासन यावर काय भूमिका घेणार हे बघणं महत्वाचं ठरणार आहे.

> **पाच्छापूर ते दर्यागाव या मार्गाची अवस्था फारच बिकट असून ऐन पावसाळ्यात नागरिकांना चिखलाचा सामना करावा लागत आहे. अवजड वाहने याचबरोबर लहान चारचाकी वाहने रस्त्यावरील चिखलात फसत आहेत. नागरिकांना तासनतास ताटकळत राहवं लागत असून शाळकरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. ठेकेदाराकडून केलेली तात्पुरती उपाययोजना कुचकामी ठरत आहे. या परिस्थितीकडे ठेकेदार पाठ फिरवीत आहे.**
>
> **- सिद्धांत गायकवाड,**
> **स्थानिक, पाली**

# सिद्धेश्वर शाळेत वृक्षारोपण



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

रा.जि.प शाळा सिद्धेश्वर तालुका सुधागड येथे ८ जुलै रोजी प्रधानमंत्री पोषणशक्ती योजनेअंतर्गत परसबाग निर्मिती करिता मुख्याध्यापिका खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली व निसर्गप्रेमी शिक्षक जनार्दन भिलारे यांच्या संकल्पनेतून १० हापूस, केशर, मल्लिका या प्रजातींची आंबा कलमे लागवड करण्यात आली.

सदरची १० कलमे जनार्दन भिलारे यांनी स्वतः तयार करून दोन वर्षे वयाची रोपे शाळेस परसबाग निर्मिती करिता भेट दिली. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी शाळा वर्धापन दिन समिती अध्यक्ष अविनाश कोनकर, गुणेश दामले, रेश्मा सुरावकर, योगेश सुरावकर, संतोष यादव, सचिन मुंढे, रोहिणी खामकर, जनार्दन भिलारे, स्वप्नाली मेमाणे, सुप्रिया पोंगडे, सावंत, यामिनी शिर्के आदी विद्यार्थी उपस्थित होते. सदर झाडे जगविण्याची जबाबदारी इको क्लब विद्यार्थी प्रमुख सुयश वाघमारे व सदस्य आणि शिक्षक जनार्दन भिलारे यांनी घेतली.

## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानद्वारे

# दत्त टेकडी कुरूळवर वृक्षारोपण

**। रायगड। प्रतिनिधी ।**

- शेकडो श्री सदस्यांची उपस्थिती

पद्मश्री डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यतिथी निमित्त डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या वतीने दत्त टेकडी कुरुळ येथे प्रतिष्ठानचे प्रमुख सचिन धर्माधिकारी यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून वृक्ष लागवड मोहीमेची सुरुवात करण्यात आली.डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या वतीने दत्तटेकडी कुरूळ येथे वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानचे प्रमुख सचिन धर्माधिकारी यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून या



उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी राहुल धर्माधिकारी, स्वरूपा धर्माधिकारी, स्वराली धर्माधिकारी, अन्विता, आराध्या, अक्षरा, श्रीयन यांनीही वृक्ष लागवड केली.

यावेळी सचिन दादा धर्माधिकारी यांनी उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करताना आंबा, कदंब, उंबर, काजू, वड, पिंपळ, आवळा, करंज यासारखी झाडे लावल्याने दरवर्षी असह्य होत जाणारे तापमान, वाढत जाणारे प्रदूषण आणी त्याच वेगाने होणारी वृक्षतोड या सर्वांवर खूप वर्षे तग धरणारी वृक्ष लागवड आणि त्याचे संवर्धन हा एक प्रभावी आणी शाश्वत मार्ग आहे. आणी त्यादृष्टीने वृक्ष लागवड, त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. तसेच नुसते झाडे लावून उपयोग नाही तर त्याची निगा राखताना त्यांना वेळीच खते, औषधे व पाणी घातले पाहिजे, असे सचिन दादा धर्माधिकारी यांनी उपस्थित सदस्यांना सांगितले.

# उरण येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रम

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्राचार्य के.ए. शामा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन उरण रेल्वे स्टेशन, भाग्यलक्ष्मी हरितक्रांती संघ व नागनाथ गुरप्पा कुठार यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

एक झाड आईसाठी या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या वतीने उरण रेल्वे स्टेशन परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला गेला. श्री नागनाथ कोठार व प्रा. डॉ.एच.के.जगताप यांच्या नियोजन व परिश्रमातून हा वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी झाला.

# ब्रेक फेल झाल्याने ट्रक कलंडला

**। पाताळगंगा । वार्ताहर।**

कर्नाटक वरून निघालेला ट्रक हा मुंबई - पुणे या मार्गावरील ४३.८०० या लेन वर येताच ट्रकच्या एअर पाईपमध्ये बिघाड झाल्यामुळे ब्रेक फेल झाला. यामुळे हे वाहन रिव्हर्स येऊन सिमेंट डिव्हायडरला ठोकर लागून पहिल्या व दुसऱ्या लेनवर पलटी झाला. या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नसून वाहनांचे नुकसान झाले.

मिळालेल्या माहितीनुसार मुंबई - पुणे या मार्गावरील वाहन चालक नयास पशा वय २६ वर्षे रा.कर्नाटक हा आपल्या जवळ असलेल्या ट्रक घेऊन मुंबईच्या दिशने जात असताना ४३.८०० या ठिकाणी येताच एअर पाईपमध्ये बिघाड झाल्यामुळे ब्रेक फेल झाला. यामुळे ट्रक रिव्हर्समध्ये सिमेंटच्या डिव्हायडरला ठोकल्यामुळे



ट्रक कलंडला. त्यामध्ये ३५ टन माल असल्यामुळे तो खाली केल्याशिवाय पर्याय नसल्यामुळे त्यास हायड्राच्या सहाय्याने बाजूला करण्यात आले.

सदर अपघाताची माहिती मिळताच, आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल महामार्गावरील वाहतूक पोलीस यंत्रणा, बोरघाट आणि खोपोली पोलीस स्टेशनच्या यंत्रणेने घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्य केले.

# ‘वृक्षारोपण आणि संवर्धन ही नैतिक जबाबदारी’

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये सुध्दा यावर्षी उन्हाच्या झळा सोसाव्या लागल्या आहेत. त्यासाठी वृक्षारोपण आणि त्यांचे संवर्धन ही काळाची गरज निर्माण झाली असून आम्ही यांचे संगोपन करणार आहोतच.परंतु सर्व नागरिकांनी सुध्दा आपल्या परिसरात एक तरी झाड जगविणे गरजेचे असून आपली नैतिक जबाबदारी असल्याचे मत वन क्षेत्रपाल उमेश जंगम यांनी व्यक्त केले.

क्षत्रिय मराठा समाज आणि संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव, मंगेश सकपाळ, प्रवीण सकपाळ, अनंत शेलार, गिरीश पवार, विजय कदम,सुनील शिंदे, रिक्षा संघटना



अध्यक्ष शकील पटेल, प्रकाश सुतार, वनपाल राजकुमार आडे, वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, महिला अध्यक्षा प्रतिभा घावरे, बिना कदम, वर्षा शिंदे, विनंती घावरे, सुहासिनी शिंदे, सोनम दाभेकर, श्रुतिका दाभेकर, हेमलता कदम, नगरपरिषदेचे कार्यालय अधीक्षक अंकुश इचके, सदानंद इंगळे, प्रवीण सुर्वे यांसह अन्य उपस्थित होते.

वनखात्याने वृक्षारोपण निमित्ताने विविध फळाफुलांची काही प्रमाणात रोपे मागविली आहेत. त्यातील काही रोपे निसर्ग पर्यटन संस्थेच्या माध्यमातून तर काही इंदिरा गांधी नगर भागातील तरुणांनी विविध ठिकाणी रोपे लावली आहेत. काही वृक्ष प्रेमींनी सुध्दा फॉरेस्ट कार्यालयातून ही रोपे लागवड केली आहे.मुख्य रस्त्यावर लावण्यात आलेल्या रोपांच्या संरक्षणार्थ वन समिती मार्फत ट्री गार्ड लावले जाणार आहेत.

> **माथेरानची वनराई बहरली तरच इथले पर्यटन बहरेल. पूर्वीचे हवामान आणि सद्यस्थितीत हवामानात जो काही बदल झाला आहे तो पर्यटनाच्या दृष्टीने काळजी करणारा आहे. वनसंपदा राहिली तरच इथे पर्यटक येतील आणि सर्वांना उपजीविकेचे साधन प्राप्त होऊ शकते त्यासाठी लहान मुलांप्रमाणे या रोपांची जोपासना केल्यास नक्कीच इथे हरित क्रांती घडेल.**
>
> **-चंद्रकांत जाधव,**
> **अध्यक्ष क्षत्रिय मराठा समाज माथेरान.**

## महिला शेतकरी गटाकडून नर्सरीत हजारो झाडांची निर्मिती

# खांडस येथे जलसंजिवनी प्रकल्प

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

युनायटेड वेच्या जलसंजिवनी प्रकल्प अंतर्गत खांडस गावातील महिलांनी दोन महिला शेतकरी गट स्थापन केले आहेत. या महिला शेतकरी संघांनी विविध प्रकारचे शेकडो झाडांच्या रोपांची लागवड केली आहे. दरम्यान, युनायटेड वे कडून या महिला शेतकरी गटाला अर्थ सहाय्य दिले असून या नर्सरीचे माध्यमातून आर्थिक उत्पन्न निर्माण करण्याचे काम महिलांनी एकत्र येवून साध्य केले आहे.

कर्जत तालुक्यातील खांडस या गावात जलसंजिवनी प्रकल्प अंतर्गत महिला शेतकरी यांनी एकत्र येत



शेतकरी गट निर्माण केला आहे.या महिला गेली तीन वर्षे युनायटेड वे या सामाजिक संस्थेच्या कार्यात योगदान देत आहे.

खांडस येथे या संस्थेचे माध्यमातून कुपोषण निर्मूलन केंद्र सुरू करण्यात आले आहे.त्यानंतर २०२३ पासून खांडस गावामध्ये युनायटेड वे कडून जल संजीवनी प्रकल्प राबविला जात आहे.या प्रकल्पात वृक्ष संवर्धन आणि जल संवर्धन आदी कामे केली जातात. त्याच माध्यमातून खांडस गावातील महिलांनी मागील वर्षी दिवाळी संपल्यावर नर्सरी सुरू करण्याचा निर्णय घेतला.त्यानुसार दोन्ही महिला शेतकरी गटांना युनायटेड वे कडून अर्थ सहाय्य करण्यात आले आहे.

या शेतकरी गटातील महिलांनी ऑक्टोबरपासून मशागत करून नर्सरी फुलवली आहे. त्या नर्सरी मध्ये विविध प्रकारची फुल आणि फळझाडे यांची रोपे निर्माण केली आहेत.त्यात आंब्याची कलमे तसेच चिकू, पेरू, काजू, चिंच, सीताफळ, आवळा, रामफळ, फणस, जांभूळ, पपई अशी फळांची झाडे निर्माण केली आहेत.तर जंगली आणि दुर्मिळ समजली जाणारी आपटा, कांचन, शिसव, बहावा, कडुलिंब, बेल, ताम्हण, भोकर, वड, पिंपळ, महू, कदंब, बेहडा, हिरडा, अर्जुन, गुलमोहर, बाभूळआदी प्रकारची झाडे यांची रोपे तयार केली आहेत.

या महिला शेतकरी गटामधील सुरेखा मंगल ऐनकर, आशा सुमंत ऐनकर, अरुणा महेश ऐनकर, गायत्री गणेश ऐनकर, कुंदा नामदेव हाबळे, मनीषा लक्ष्मण ऐनकर, निता संतोष डुकरे, वैदेही रघुनाथ ऐनकर, मंदा अनंता ऐनकर, रेणुका संतोष ऐनकर, अलका शंकर ऐनकर, मनूबाई अनंता डुकरे, विमल रवींद्र ऐनकर आदी महिला शेतकरी यांनी अशी रोपवाटिका निर्माण केली आहे.

# योजनांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

## कृषी अधिकारी कांबळे यांचे आवाहन

**। म्हसळा । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परीषद यांच्या पुढाकारातून कृषी विभाग आणि केंद्र सरकार पुरस्कृत व राज्य सरकार पुरस्कृत अनेक योजना व जिल्हा परिषद सेसमधून शेतकऱ्यांसाठी मंजूर झाल्या आहेत. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी पंचायत समितीच्या कृषी विभागाकडे अर्ज करण्याचे आवाहन कृषी अधिकारी बबनराव कांबळे यांनी म्हसळा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी केले आहे.

यात राज्य शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेअंतर्गत सिंचन सुविधा करण्यासाठी अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी नवीन विहीर जुनी विहीर दुरुस्ती इनवेल बोरिंग पंप सेट वीज जोडणी शेततळ्यासाठी प्लास्टिक अस्तरीकरण,सूक्ष्म सिंचन ठिबक संच, तुषार संच इत्यादी या योजना मंजूर आहेत. राज्य शासनाच्या बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती जमातीच्या शेतकऱ्यांसाठी नवीन विहीर, जुनी विहीर, दुरुस्ती इंवेल बोरिंग कंपसेट वीज जोडणी शेततळ्याला प्लास्टिक अस्तरीकरण, सूक्ष्म सिंचन, ठिबक संच, तुषार संच, पाईपलाईन, परसबाग आधी योजना असल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा परिषद सेसमधून सर्वांकष पीक संरक्षण योजनेअंतर्गत ७५ टक्के अनुदानाने पीक संरक्षण पुरवठा तसेच १००% अनुदानातील महिला बचत गट शेतकरी गट यांना कडधान्य तसेच भाजीपाला बियाणांचे मिनी किट वाटप, ५० टक्के अर्थ सहाय्याने भुईमुगाचे बियाणे त्याचबरोबर शेतकऱ्यांची पूर्ण संमती घेऊन खरेदी केलेल्या ताडपत्रीवर ७५ टक्के अनुदान व ७५ टक्के अनुदानातून शेतकऱ्यांना सौर ऊर्जेवर चालणारे घरगुती दीपसंच शेतीविषयक सुधारित अवजारे या योजनेतून भाजीपाला लागवड. प्रोत्साहन योजना सेंद्रिय शेती प्रोत्साहन म्हणून जीवामृत व बिजामृत तसेच कंपोस्ट खत निर्मिती व गांडूळ खताची निर्मिती या योजना ८५ टक्के अनुदानात केली जाईल, यामुळे शेतकऱ्यांनी अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषिविभाग म्हसळा मार्फत करण्यात येत आहे.

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# तिजोरीला आणखी भोके

सामान्य माणसांना दर महिन्याला ठराविक वेतन किंवा मजुरी मिळते. धंदा-व्यापार करीत असली तरीही त्यांचे उत्पन्न ठरलेले असते. त्यामुळे सतत खिशाचा कानोसा घेऊनच त्यांना पैसे खर्चायचे की नाही हे ठरवावे लागते. पण सरकार, मग ते लोकशाहीतील असले तरीही, मनाचा राजा असते. ते आधी नवनवीन खर्च कसे वाढवता येतील याचा सतत विचार करते. पैसे आपोआप येतीलच असे त्याला वाटते. त्यातून मुख्यमंत्री रमणा-महर्षी एकनाथराव शिंदे असले आणि विकासपुरुष अजितदादा पवार हे अर्थमंत्री असले तर त्या सरकारसाठी मात्र झाडालाच पैसे लागतात. दुर्दैवाने, मराठी जनताच अशी करंटी आहे की तिला ना सुधीर मुनगंटीवारांनी लावलेली झाडे दिसत ना, शिंदे-पवारांना दिसतात तसे झाडाला लागणारे पैसे दिसत. राज्य विधिमंडळात अजित पवार यांनी तब्बल ९५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. एकीकडे यंदाचा ६ लाख कोटींचा अर्थसंकल्प मंजूर होत असतानाच सदनापुढे या नवीन मागण्या टाकण्यात आल्या. महाराष्ट्र हे एकेकाळी आर्थिकदृष्ट्या सुस्थिर आणि प्रशासनाच्या दृष्टीने भक्कम राज्य मानले जात असे. पण शिंदे, फडणवीस, दादांना ही कीर्ती नकोशी झालेली दिसते. दादांनी जून महिन्यात सादर केलेला पुरवणी अर्थसंकल्प पाहून हा अर्थसंकल्प की चेष्टा असे आम्ही याच सदरात म्हटले होते. आता या पुरवणी मागण्या सादर करून दादांनी ती चेष्टाही लाजावी असा कहर प्रकार केला आहे. कोणतेही सरकार आपल्या अर्थसंकल्पात वार्षिक ताळेबंद मांडत असते. कर हे त्याचे उत्पन्नाचे मुख्य साधन असते. खर्च तीन प्रकारचे असतात. एक म्हणजे कर्मचाऱ्यांचे पगार, इमारतींची भाडी, रस्ते इत्यादींची दुरुस्ती असे नेहमीचे खर्च. हे करावेच लागतात. पण हा खर्चाचा आकडा वर्षाला किती येणार याची सरकारला कल्पना असते. दुसरे दोन खर्च मात्र किती करायचे याचा निर्णय सरकारला घ्यायचा असतो.

### शिस्तीचे तीनतेरा

हे खर्च असतात भांडवली आणि मदतकारी योजनांवरचे. भांडवली खर्चामध्ये रस्ते, धरणे, इस्पितळे इत्यादी बांधण्याचा समावेश असतो. गरीब विद्यार्थ्यांची फी भरणे ही भावी विकासातील गुंतवणूक मानली जाते. तर संजय गांधी निराधारसारख्या योजना या मदतकारी योजना म्हटल्या जातात. लोकशाहीत अंतिमतः सर्व पैसा लोकांचाच असतो. त्यामुळे लोकांच्या भल्यासाठी तो खर्च होणे यात गैर काही नसते. पण हा खर्च करताना तारतम्याचे भान ठेवावे लागते. पण हे तारतम्य आता वाऱ्यावर सोडून देण्यात आले आहे. अर्थसंकल्पांच्या व्यतिरिक्त सरकारला आकस्मिक जादा खर्च करावे लागू शकतात. पूर किंवा अवर्षणाची नुकसानभरपाई, विकास योजनांसाठी कमी पडणाऱ्या रकमांची भरपाई अशी त्यामागची कारणे असतात. त्यासाठी अर्थसंकल्पानंतर सरकारेला विधिमंडळात पुरवणी मागण्या मांडतात. नड भागवण्यासाठी तुम्ही-आम्ही हातउसने घेतो तसाच हा प्रकार असतो. साधारणपणे वर्षातून तीनदा अशा पुरवणी मागण्या सादर करता येतात. मात्र त्या सर्वांमधून मिळून मागितलेली एकूण रक्कम राज्याच्या अर्थसंकल्पाच्या दहा टक्क्यांहून अधिक असू नये असा संकेत आहे. कारण या जादाच्या मागण्या म्हणजे राज्याच्या उत्पन्नाच्या पलिकडचे खर्च असतात. ते भागवण्यासाठी सरकारला बाजारातून कर्ज घ्यावे लागते. राज्याची वित्तीय तूट तीन टक्क्यांच्या मर्यादेपलिकडे गेली तर या कर्जाच्या व्याजाचे दर चढे असतात. तो बोजा जनतेवरच येतो. महाराष्ट्रात ही तूट आधीच चार टक्क्यांहून अधिक झाली आहे. आर्थिक शिस्तीमध्ये आजवर महाराष्ट्र देशातील अव्वल राज्य होते. पण शिंदे-दादांनी त्याची वाट लावायची ठरवलेली आहे. गेल्या वर्षी एकूण अर्थसंकल्पाच्या सतरा टक्के इतक्या प्रचंड पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. यंदा तर पुरवणी अर्थसंकल्प मांडतानाच ९५ हजार कोटींची वेगळी मागणी करण्यात आली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे नऊ महिने अजून बाकी आहेत. तोवर आपण सोळा टक्के अधिकची रक्कम मागितली आहे. उर्वरित काळात आणखी पुरवणी मागण्या मांडाव्या लागणार आहेतच. म्हणजे ही रक्कम एकूण अर्थसंकल्पाच्या वीस टक्क्यांहून अधिक होईल अशी लक्षणे आहेत.

### पोकळ घोषणा

त्यातही दादांची चलाखी अशी आहे की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी सुमारे २५ हजार कोटी रुपये या मागण्यांमधून उभे केले जातील. यंदा अर्थसंकल्पात योजनेची घोषणा झाली. त्यामुळे तिथेच त्यासाठी पुरेशी तरतूद केली जायला हवी होती. पण ते झालेले नाही. तरुणांना शिकाऊ नोकऱ्या पुरवण्याची योजना आणि सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जांसाठी हमी याकरिता सुमारे आठ हजार कोटी रुपये देखील या मागण्यांमधून उभे होणार आहेत. म्हणजे त्यांचीही तरतूद तेथे नव्हती. अर्थसंकल्पाच्या वेळी जाहीर बहुसंख्य योजना या नुसत्या फसव्या घोषणा असतात, त्यासाठी तरतूद शून्य असू शकते हे या निमित्ताने जनतेने लक्षात घ्यायला हवे. भारतासारख्या गरीब देशामध्ये एकाच वेळी अनेक गरजांवरचे खर्च हे समर्थनीय ठरू शकतात. उदाहरणार्थ, मुलींच्या शाळेतील टॉयलेट्स, एखाद्या खेड्यातली एसटी सेवा आणि जिल्हा रुग्णालयातील प्रसूती कक्षातील छताची दुरुस्ती या सर्वच गोष्टी महत्वाच्या असतात. कशाला महत्व द्यायचे यात सरकारची कसोटी लागते. अर्थसंकल्पात यांचा समतोल राखावा लागतो. पण सरकारे याचे भान न ठेवता मते मिळवण्यासाठी वाटेल त्या गोष्टी करतात. यंदा अजितदादांच्या अर्थसंकल्पात असंख्य जाती-जमातीतील थोर स्त्री-पुरुषांच्या नावाने योजना आहेत. हे पैसे प्रत्यक्षात किती दिले जातात हा वेगळा मुद्दा. पण कागदावर ही तरतूद दाखवल्याने दुसरीकडे एखाद्या रस्त्याच्या रुंदीकरणाकरिता किंवा कोकणात धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी मग निधी नाही असे ऐकावे लागते. लोकांना भुलवण्यासाठी पैशांविनाच्या पोकळ घोषणा करणे ही शुध्द फसवणूक आहे. त्यानंतर त्यापैकी काही योजनांसाठी तिजोरीला भोके पाडणे हा तर गुन्हेगारी स्वरुपाचा प्रकार म्हणायला हवा. ऐन निवडणुकीच्या तोंडावर कदाचित शेतकरी कर्जमाफीच्या नावाखाली आणखी भोके पाडली जातील. काय वाटेल ते करून निवडणूक जिंकण्यासाठी चाललेला हा अंदाधुंद कारभार अंतिमतः जनतेच्या मुळावर येणार आहे.

विचार

# देशासाठी फायदा, तरीही विरोध का?

***तिसऱ्यांदा सत्ता हाती आल्यानंतर केंद्र सरकार ॲक्शन मोडमध्ये आले आणि एका महत्वाच्या बैठकीमध्ये पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर प्रकल्पाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. अवघ्या देशासाठी, व्यापारवाढ आणि व्यापार सुलभतेसाठी हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा असल्याचे सांगितले जात आहे. नेमका काय आहे, तो देशासाठी किती महत्त्वाचा आहे, त्याला स्थानिकांचा विरोध कशासाठी होत आहे, हे तपासून घेण्याचा हा प्रयत्न.***



**सायली शिगवण**

सत्ता हाती आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये पालघर जिल्ह्यामधील वाढवण बंदर प्रकल्पाला मंजुरी दिली. यासाठी सरकारने तब्बल ७६ हजार २२० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सरकारने वाढवण बंदराला मंजुरी देताच स्थानिकांकडून प्रकल्पाला होणारा विरोधदेखील वाढला. स्थानिक मच्छीमार आणि शेतकऱ्यांनी आंदोलनाची तयारी सुरु केली. 'वाढवण बंदराची एकही वीट रचू देणार नाही', 'एकच जिद्द, वाढवण बंदर रद्द' अशा घोषणा देत या भागातील लोकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला. विशेष म्हणजे केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकारचा 'ड्रीम प्रोजेक्ट' म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे.

१९९१ मध्ये या प्रकल्पाचा विचार सुरू झाला होता. मागील २५ वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या या प्रकल्पाने २०१६ मध्ये गती घेतली. सत्तेमध्ये आल्यानंतर नरेंद्र मोदी मंत्रिमंडळाने या प्रकल्पावर लक्ष केंद्रीत केले. पण स्थानिकांकडून होणारा विरोध पाहता हा प्रकल्प गुंडाळून ठेवण्यात आला होता. त्यानंतर २०२० मध्ये केंद्र सरकारने प्रकल्पाला अंशतः मंजुरी दिली होती. पण आता तिसऱ्यांदा सत्तेमध्ये येताच केंद्र सरकारने या प्रकल्पाला अंतिम मंजुरी दिली. त्यामुळे पुन्हा एकदा या विरोधात आंदोलन पेटण्याची शक्यता आहे. त्यासाठी विविध सामाजिक संघटना एकवटल्या असल्याचे बोलले जात आहे. असे असले तरी हा प्रकल्प नेमका कसा आहे आणि तो देशासाठी किती महत्त्वाचा आहे, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

पालघर जिल्ह्यामधील वाढवण गावाजवळ या बंदराची उभारणी केली जाणार आहे. प्रकल्पासाठी भौगोलिकदृष्ट्या ही जागा अत्यंत महत्त्वाची असल्याचे बोलले जात आहे. कारण, समुद्र किनाऱ्यावर २० मिटरपेक्षा जास्त खोली असणारे हे देशातील एकमेव अनुरुप ठिकाण आहे. इथे जगातील सर्वात मोठे कंटेनर शीप लागू शकते. त्यामुळे इथे कितीही मोठे कंटेनर लोड किंवा अनलोड केले जाऊ शकतात. देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईपासून हे बंदर अवघ्या १५० किलोमीटर अंतरावर आहे. तसेच हे ठिकाण रेल्वेमार्गानेही जोडलेले आहे. बंदरापासून केवळ १२ किलोमीटर अंतरावर डहाणू रेल्वे स्टेशन आहे. त्यामुळे रेल्वेने देशभरामध्ये मालवाहतूक करणेदेखील सोयीचे ठरणार आहे. समुद्रामध्ये सहा किलोमीटर अंतरावर हे बंदर उभारले जाणार आहे. त्यासाठी समुद्रामध्ये सुमारे तीन हजार ५७८ एकर एवढा भराव टाकला जाणार आहे. हे ग्रीन फिल्ड डीप ड्राफ्ट प्रकारचे बंदर असणार आहे. इथे महाकाय कार्गो शीप हाताळल्या जातील. या बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रिक टन मालाची आयात-निर्यात करणे शक्य होईल. यामध्ये सुमारे २३.२ मिलियन टीईयु कंटेनर हाताळण्याची क्षमता आहे. टीईयु हा कंटेनरचा प्रकार असून अशा कंटेनरची लांबी मोठी असते. इतर बंदरांवर एवढ्या मोठ्या प्रमाणात कंटेनर लोड-अनलोड करणे कठीण जाते. पण वाढवण बंदरामुळे हा प्रश्नदेखील मिटणार आहे.

या बंदराचे बांधकाम दोन टप्प्यांमध्ये लँड लॉर्ड पोर्ट मॉडेलच्या आधारावर केले जाणार आहे. यामध्ये पोर्ट ऑथॉरिटी लँड लॉर्डप्रमाणे काम करेल. ती व्यापाराला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास करेल. बंदराशी संपर्क वाढवण्यासाठी दळणवळणाच्या विविध सुविधा उपलब्ध करून देईल. भारतातील ८० टक्के बंदरे याच मॉडेलनुसार काम करतात. या बंदराची निर्मिती जेएनपीए अर्थात जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण आणि एमएमबी महाराष्ट्र सागरी मंडळाच्या माध्यमातून होणार आहे. अस्तित्वात येईल तेव्हा या बंदरात अनेक अत्याधुनिक सुविधा दिल्या जाणार आहेत.

या प्रस्तावित बंदरामध्ये प्रत्येकी एक हजार मीटर लांबीचे नऊ कंटेनर टर्मिनल असतील. किनारी धक्के, चार लिक्विड कार्गोबर, एक रोरोबर आणि एक तटरक्षक धक्कादेखील असेल. येथे इतर व्यवसायिक पायाभूत सुविधांचाही विकास केला जाणार आहे. शिवाय, मंत्रिमंडळाने बंदरासह बंदराचे रस्ते आणि रेल्वेजोडणीचा प्रकल्प मार्गी लावत रेल्वे फ्रेट कॉरिडॉरलाही मान्यता दिली आहे. त्यामुळे मालवाहतूक सुलभ होणार आहे. पुढच्या वर्षी पावसाळ्यानंतर बंदराच्या समुद्रातील कामालादेखील सुरूवात केली जाणार आहे. तत्पूर्वी बंदराकडे जाण्यासाठी लागणाऱ्या या नव्या रस्त्यांची उभारणी केली जाईल. या वर्षी सप्टेंबरनंतर या कामाला सुरूवात होईल, अशी माहिती 'जेएनपीए'च्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

२०२७ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा सरकारचा मानस आहे. पण देशासाठी अत्यंत महत्वाच्या या प्रकल्पाला स्थानिकांचा विरोध का होतो आहे? पालघर हा आदिवासीबहुल जिल्हा आहे. इथल्या नैसर्गिक संसाधनांवर इथल्या समाजाची उपजीविका अवलंबून आहे. बंदराची उभारणी झाल्यावर इथल्या जैवविविधतेवर परिणाम होईल, असे बोलले जात आहे. त्यामुळे स्थानिक मच्छीमारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होईल. जिल्ह्यातील मासेमारी कायमची नाहीशी होईल. परिणामी, वाढवण बंदर परिसरामध्ये मच्छीमारी करणाऱ्या हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल, अशी भीती स्थानिकांना वाटत आहे. डहाणू हा हरितपट्टा आहे. बंदरामुळे इथल्या पर्यावरणाचा ऱ्हास होईल. तसेच या परिसरातील बागायतदार आणि लहान व्यावसायिकांचे नुकसान होईल. याशिवाय या बंदरापासून साधारण १५ किलोमीटर अंतरावर तारापूर अणुविद्युत केंद्र आहे. या केंद्राला बंदरामुळे धोका निर्माण होऊ शकतो, अशीही भीती नागरिकांना वाटत आहे. त्यामुळे या प्रकल्पाला आता विरोध केला जात आहे. यासाठी बंदर विरोधी संघटना एकवटल्या आहेत. आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी बैठका पार पडत आहेत. बैठकीला विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि मच्छीमार देखील आवर्जुन उपस्थित राहत आहेत. त्यामुळे वाढवण बंदर विरोधातील लढा आणखी तीव्र होण्याची शक्यता वाटत आहे.

यापूर्वीदेखील इथल्या स्थानिकांनी बंदराच्या विरोधामध्ये तीव्र आंदोलन केले होते. डहाणू तालुक्यातील झाईपासून मुंबईच्या कोलाबापर्यंत मानवी साखळीदेखील उभारण्यात आली होती. इतका विरोध असतानादेखील केंद्रीय मंत्रिमंडळाने वाढवण बंदराला मंजुरी दिली आहे. वाढवण बंदर समुद्रामध्ये सहा किलोमीटर आतमध्ये उभारण्यात येणार आहे. त्यामुळे बंदराच्या प्रत्यक्ष कामासाठी जमीन अधिग्रहीत करण्याची गरज नाहीये. मात्र मालाची ने-आण करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या रस्ते आणि रेल्वेमार्गासाठी एक हजार ४०० एकर जमीन वापरावी लागणार आहे. यालादेखील स्थानिकांचा विरोध आहे.

एकीकडे वाढवण बंदराचा विरोध होत असला तरी या बंदरामुळे १२ लाख रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा सरकारचा दावा आहे. यातून लाखो नागरिकांना प्रत्यक्ष रोजगार मिळू शकतो. त्यासाठी स्थानिकांना २८ प्रकारचे प्रशिक्षणदेखील दिले जात आहे. त्याचबरोबरीने इथे इतर व्यवसायांचाही विकास होईल. बंदरातून केवळ मालाची वाहतूक करण्यासाठी जवळपास ५० हजार ट्रकचालकांची गरज असणार आहे. याशिवाय हे बंदर समुद्रामध्ये उभे राहत असल्यामुळे कोणालाही विस्थापित केले जाणार नाहीये. बंदरामुळे विकासाच्या दृष्टीने पालघरचा कायापालट होईल, असेदेखील 'जेएनपीए'कडून सांगितले जात आहे. तरीदेखील नागरिकांकडून त्यासाठी कडाडून विरोध होत आहे.

वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष नारायण पाटील यांनी याविषयी बोलताना, केंद्र सरकारने वाढवण बंदर उभारण्याचा हुकुमशाही पद्धतीने घाट घातला आहे. त्यांनी परवानगी दिली असली तरी हरित लवादापुढे आणि स्थानिक पातळीवर आम्ही वाढवण बंदराचा लढा आणखी तीव्र करणार आहोत, असा इशारा दिला आहे. त्यामुळे आगामी काळामध्ये हा संघर्ष वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे बंदर देशासाठी गेमचेंजर ठरू शकते, असेदेखील बोलले जात आहे. या बंदरातून प्रामुख्याने कोळसा, सिमेंट, केमिकल आणि तेलासह विविध प्रकारची मालवाहतूक केली जाणार आहे. वाढवण बंदर हे जगातील टॉप टेन बंदरांपैकी एक असेल, असेही बोलले जात आहे. त्यामुळे भारत अधिक क्षमतेने आपला मालाची निर्यात दुसऱ्या देशांमध्ये करू शकेल. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेलादेखील बळ मिळेल, असे अभ्यासकांचे मत आहे.

आजकाल

# बीएसएनएल- आपली लूट अटळ आहे?

**आनंद शितोळे**

जिओच्या किंमती वाढल्या म्हणून बीएसएनएलकडे जाणाऱ्या भाबड्या लोकांसाठी.

१८५० साली भारतात पोस्ट आणि तार खाते सुरु झाले आणि तारसेवा सुरु झाली. १८८० साली खाजगी टेलिफोन कंपन्यांनी सेवा सुरु केली.

१८५० पासून कालपरवापर्यंत या खात्यांच्या कामासाठी भारतभरात वेगवेगळ्या ठिकाणी मोक्याच्या जागी सरकारने जमिनी खरेदी करून ऑफिस बांधली.

आजमितीला या फक्त बीएसएनएल च्या मालकीच्या मुंबई, कोलकता, दिल्ली, चेन्नईपासून दुर्गम गावात असलेल्या स्थावर मालमत्तेची बाजारभावाने किंमत किमान तीन लाख कोटी असेल.

वेगवेगळी यंत्रसामग्री, देशभरात असलेले टेलिफोन नेटवर्क, टॉवर्स हि मालमत्ता वेगळी.

विशेष म्हणजे हि सगळी मालमत्ता कर्जमुक्त आहे.

ग्रामीण भारतात जिथे सगळ्या टेलिफोन एक्स्चेंजचे बिल महिन्याला वीजबिल भरायला पण पुरत नाही तिथे वर्षानुवर्षे बीएसएनएल टेलिफोन सेवा तोट्यात जाऊनही पुरवते कारण हि जबाबदारी समजली जाते. अश्या दुर्गम भागात खाजगी कंपनी सेवा देण्याचा विचारही करणार नाही.

कर्जमुक्त असणारी बीएसएनएल अतिशय माफक दरात सुविधा देऊ शकते.

नेमक हेच सगळ बीएसएनएलच्या मुळावर उठलेले आहे.

बीएसएनएल कागदावर खाजगी कंपनी आहे जिची मालकी अर्थात भागभांडवल सरकारी आहे. सगळे धोरणात्मक निर्णय आयटीएस अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगातून गेलेले सरकारी अधिकारी घेतात.

जर बीएसएनएल उत्तम आणि माफक दरात सेवा देऊ शकत असेल तर खाजगी कंपन्या स्वप्नातही बीएसएनएलशी स्पर्धा करू शकणार नाहीत.

पण खाजगी टेलिकॉम कंपन्यांना धंदा करायला रान मोकळ करून द्यायचं आहे.

मग पर्याय काय?

बीएसएनएलला उत्तम तंत्रज्ञान विकसित करण्याची, विकत घेण्याची, निधी उभारण्याची, तंत्रज्ञांची भरती करण्याची आणि स्पर्धेत उतरण्याची संधीच नाकारली जाते,

रेल्वेला सेवा पुरवायला जे टेंडर भरले जात ते भरण्यासाठी दर ठरवणारे बाबू लोक असे दर ठरवतात की आपोआप टेंडर खाजगी कंपनीच्या झोळीत पडेल.

मागच्या काही वर्षात ४० टक्के कर्मचारी स्वेच्छानिवृत्ती घेऊन घरी गेलेत, नवी भरती नाहीये, नवी मशिनरी नाहीये, नव तंत्रज्ञान नाहीये अशा वेळी कसली डोंबलाची सेवा बीएसएनएल देईल?

कामचुकार कर्मचारी पाच टक्के असतीलही पण उरलेले ९५ टक्के जी कंपनी पोट भरते तिच्या मिठाला जागणारे आहेत पण त्यांचे हात बांधलेले आहेत.

बीएसएनएलची निर्णयकर्ते आणि धोरणकर्ते मालकच जर खाजगी टेलिकॉम कंपन्यांना फायदा होईल अशी धोरण आखत असतील तर तुम्ही बीएसएनएल मध्ये जाऊन तरी काय करणार आहात?

बहुतांशी सरकारी काम, बँकिंग, विमा, शैक्षणिक अर्ज, नोकरीचे अर्ज, परवाने, काहीही घ्या, तुम्हाला इंटरनेट वापरून काम करणे अनिवार्य आहे.

इंटरनेट फोनवर वापरायच नसेल तर तुम्हाला कुठेतरी सेतू, इंटरनेट कॅफेत जाऊन काम करायला लागेल, त्यासाठी वेळ पैसा आलाच.

आता छोट्या माशांना गिळंकृत करून उरलेल्या दोन तीन मोबाईल कंपन्या संगनमताने कितीही दर वाढवणार असल्या तरी तुम्हाला पर्याय नाहीये.

सरकारी सगळी धोरण बीएसएनएल जिवंत राहावी पण बिनकामाची असावी अशीच आहेत.

आपली लुट अटळ आहे.

गंमत म्हणजे हि लिहायला मी मोबाईलवर सोशल मिडिया वापरताना यापैकी कुठच्यातरी एका कंपनीचे नेटवर्क आणि इंटरनेट वापरून लिहितोय आहे असं आहे.

लोकसंसद

### हवामानखात्याचा अंदाज आणि समाजमाध्यमांवरचे विनोद

रविवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईकरांची सकाळ उगवली तीच मुळी ठिकठिकाणी पाणी साचल्यामुळे कोलमडलेल्या वाहतुकीच्या बातम्यांनी. पहिल्याच पावसाने नालेसफाईचे दावे दरवर्षीप्रमाणे फोल ठरवले. सोमवारीही पाऊस अधूनमधून होता. सकाळी मुंबई आणि उपनगरातील शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. सोमवारचा दिवस संपता संपता हवामान खात्याच्या मंगळवारच्या अतिवृष्टीचा इशारा लक्षात घेऊन मंगळवारीही शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. पण मंगळवारी मात्र पावसाने उसंत घेतली. हवामान खात्याचा अतिवृष्टीचा इशारा सपशेल चुकला आणि समाजमाध्यमांवर त्या अंदाजाची खिल्ली उडवणारे विनोद पसरवले गेले. हवामान खात्याचा अंदाज चुकण्याची ही पहिली वेळ नव्हती. आधुनिक तंत्रज्ञान हाती असताना हवामानाचे अंदाज का चुकतात? तसे ते चुकू नयेत यासाठी योग्य ती पावले उचलावीत. नाहीतर नेहमीप्रमाणे हवामान खात्याचा अंदाज विनोदनिर्मितीस कारणीभूत ठरत राहिल.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**११ जुलै**

**१८४७ :-** चरित्रकार, नाटककार कृष्णाजी आबाजी गुरुजी यांचा जन्म. त्यांनी लिहिलेले 'बाळ गंगाधर टिळक' यांचे चरित्र हे मराठीतील लो. टिळकांचे पहिले चरित्र. यानंतर 'माधवाचार्य चरित्र','नाट्यकलेची उत्पती','नाटकांची स्थित्यंतरे' ही पुस्तके. 'घागरगडचा सुभेदार' हे नाटक लिहिले. **१८५८:-** अव्वल ब्रिटिश अमदानीत उत्कृष्ट भाषांतरकार असा नावलौकिक संपादन करणारे हरी केशवजी पाठारे यांचे निधन. नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने त्यांनी पुढील भाषांतरीत पुस्तके प्रसिध्द झाली. 'सिध्दपदार्थ विज्ञानशास्त्रविषयक संवाद', 'रसायन शास्त्रविषयक संवाद', 'यांत्रिक क्रमण', 'देश व्यवहार व्यवस्था' आदी पुस्तके प्रकाशित झाली. **१८८९:-** ख्यातनाम कादंबरीकार, कथालेखक नारायण हरी आपटे यांचा जन्म. त्यांनी वयाच्या १५व्या वर्षी देशाटन करावे म्हणून चक्क घर सोडून पळाले. या काळात विविध विषयाचा अभ्यास विशेषतः राजपूतांच्या स्वाभिमानी इतिहासाचा. यामुळेच समाजहित व देशहितपोषक लेखन करायचे हे ध्येय. 'अजिंक्यतारा' या कादंबरीतून १८ व्या शतकातील महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाचे चित्र रेखाटले त्यांनतर राजपूतांच्या इतिहासाशी संबंधित 'लांछित चंद्रमा', 'राजपुतांचा भीष्म', 'संधिकाल' इ. कादंबऱ्या गाजल्या. तसेच 'पिशाच साधन अथवा आसुरी संपीचा परिणाम' ही अद्भूतरसात्मक कादंबरी, तसेच 'वंदावे की निंदावे' ही सामाजिक दीर्घकथा. आमची गृहचित्रे मालेतून 'भुरळ', 'कर्मगती' या कादंबऱ्या. याशिवाय 'कपटजाल' ,'रत्नगुंफा','अजरामर','पुरुषाचे भाग्य', 'उमजेल तर','अपेक्षा','जाऊबाई','कोणी कोणाचे नव्हे' अशा एकापेक्षा एक सरस आणि सामाजिक प्रश्नांना हात घालणाऱ्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. तरुण पिढीला मार्गदर्शन करणारी 'सुखाचा मूलमंत्र' व 'आयुष्याच्या पाया' ही पुस्तके तसेच व्ही. शांताराम यांचा 'कुंकू' हा चित्रपट त्यांच्याच कादंबरीवर बेतलेला आहे. **१८९१:-** लेखक, प्राच्यविद्यापंडीत प्रा. परशुराम कृ ष्ण गोंडे यांचा जन्म. जवळजवळ ४०० पुस्तकांचे समालोचन त्यांनी विविध नियतकालिकातून केले. तसेच भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातील अनेक कॅटलांगचे ते संपादक होते. **१९२१:-** कथा, कादंबरीकार, लेखक शंकरराव रामराव खरात यांचा जन्म. 'बारा बलुते दार', 'तडीपार', 'सांगावा','गावशीव' आदी कथासंग्रह. 'पारधी','हातभट्टी', 'झोपट्टी' या कादंबऱ्या. तसेच 'आज इथं उद्या तिथं' हे ललित लेखसंग्रह मराठीत मोलाचे मानले जातात. याशिवाय 'दलित वाङ्‍मय प्रेरणा व प्रवृत्ती','डॉ.आंबेडकरांचे धर्मांतर',डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात' आदी पुस्तके आणि 'तराळ-अंतराळ' हे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. **१९३६ :-** 'दाटूनी कंठ येतो, हृदयी वसंत फुलताना' यासारख्या सहज सुंदर गीतरचनेद्वारे मराठी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे गीतकार शांताराम नांदगावकर यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९३६ साली झाला. कोकणातील मालवण जिल्ह्यातील नांदगाव हे त्यांचे मूळ गाव. शिक्षण मुंबईत झाले. इंडियन एअरलाईन्समध्ये नोकरीला असणाऱ्या नांदगावकरांची पावले कविता आणि गीतलेखनाच्या आवडीमुळे चित्रपटसृष्टीकडे आपोआप वळली. 'ही नव्हे चांदणी, ही तर मीरा गाते' हे त्यांनी गायलेले पहिले गीत हिट झाले. यानंतर खूप ऑफर्स आल्या, पण त्यांनी कथेत गीतरचनेला उत्तम वाव असला तरच गीते लिहिली आणि म्हणूनच 'रुपेरी वाळूत माडाच्या वनात, प्रथम तुला वंदितो, दलितांचा राजा भीमराव माझा, ससा तो कापूस जसा है बालगीत तसेच धुमधडाका, नवरी मिळे नवऱ्याला, पैजेचा विडा यासारख्या गाजलेल्या चित्रपटातील गीते खूपच गाजली. सेना-भाजपच्या युती शासनाच्या काळात ते राज्य नाट्य सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष होते. ११ जुलै २००९ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने एक सृजनशील, अभ्यासू गीतकार आपल्यातून निघून गेला. **१९५०:-** लेखिका सुप्रिया अनंत अय्यर यांचा जन्म. 'खुळी बोगनवेल' हा कथासंग्रह, 'उन्हें वेचता वेचता' ह ललित लेखसंग्रह,'ज्याचं त्याचं आभाळ' ही कादंबरी आणि वऱ्हाडी कथासंग्रहात त्यांची 'बडी उलार झाली' ही कादंबरी समाविष्ट आहे. **१९५४:-**साहित्यिक विष्णू श्रावण भेंडारकर यांचा जन्म. ह्यांच्या साहित्य संपदेत 'जागरगाणी' हा गीतसंग्रह, 'कथा एका गावाची' ही दीर्घकथा. 'गोड्या पाण्यातील झिंग शेती' हा माहितीपर ग्रंथ. 'अक्षरलेणी' हा काव्यसंग्रह, 'चवबारा' हा झाडीचारोळीसंग्रह आणि 'संस्कार' हा संपादित प्रकाशित काव्यसंग्रह अशी साहित्यसंपदा. **१९५५:-** लेखक सुहास द. बारटक्के यांचा जन्म. 'किशोर संस्कार कथा','बल्ल्या व इतर कथा', 'साद मयुराची', 'तुकारामाचे बील', 'वडापाव', 'कोकणातल्या आडवाटा' इ. पुस्तके प्रसिध्द. **१९८९:-** नाट्यलेखक मनोहर सीताराम पोलकनवार यांचे निधन. पेशाने बस कंडक्टर. ह्यांचे 'नयन बावरे झाले','लावणी झाली गं वैरिणी' आणि 'नवऱ्याचा केला राघो' आदी नाटके प्रसिध्द झालीत. **१९९२:-** लेखक, पत्रकार अर्थतज्ञ गोविंद मंगेश लाड यांचे निधन. **२००३:-** १९८० च्या दशकातील युवा पिढीला भुरळ घालणारे लोकप्रिय कादंबरीकार सुहास शिरवळकर यांचे निधन. त्यांची 'दुनियादारी' ही गाजलेली कांदबरी.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ४१(२)] बुधवार, मार्च १३, २०२४/फाल्गुन २३, शके १९४५ [पृष्ठे ८१, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १४०

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ मार्च २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते-८.—ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम ४ च्या परंतुकाच्या तरतुदीं अनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” म्हणून करण्यात आला आहे) रेवस-रेड्डी सागरी महामार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र.०५ यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त महामार्ग” असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे;

**अधिसूचना**

सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०००३२.
दिनांक १३ मार्च २०२४.

महाराष्ट्र महामार्ग अधिनियम

क्रमांक- खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते-८.- ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम ४ च्या परंतुकाच्या तरतुदीं अनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" म्हणून करण्यात आला आहे) रेवस-रेड्डी सागरी महामार्ग म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र.०५ यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित महामार्ग प्राधिकरणाने उक्त महामार्गाच्या संदर्भात महामार्ग प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे की, यासोबत जोडलेल्या *अनुसूचीत* उल्लेखित जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी आवश्यक एक सार्वजनिक प्रयोजन म्हणून उक्त अधिनियमाच्या तरतुदीं अंतर्गत उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित करण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की, एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन ही उक्त महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक आहे आणि म्हणून उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, पूर्वोक्त प्रयोजनांकरिता, उक्त जमीन संपादित करणे शासनास इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५५) याच्या कलम १५ च्या पोट- कलम *(२)* व *(३)* व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,-

*(एक)* उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी उक्त जमिनीचे संपादन करण्याची घोषणा करीत आहे;

*(दोन)* विनिर्दिष्ट करीत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ७ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेला प्रतिसाद म्हणून ज्यांच्या हरकती व सूचना यापूर्वीच विचारात घेतल्या आहेत किंवा महामार्ग प्राधिकरणाकडून सुनावणी झाली आहे अशा व्यक्तींखेरीज उक्त जमिनीशी हितसंबंधित कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना *महाराष्ट्र शासन राजपत्रात* प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी तथा उप-विभागीय अधिकारी, अलिबाग, जिल्हा रायगड यांच्याकडे उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठीच्या प्रयोजनांसाठी उक्त जमिनीच्या वापराबाबत लेखी व त्याच्या कारणांसह आक्षेप घेऊ शकते.

***अनुसुची***

*संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन*

**तालुका : अलिबाग** **जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| *(१)* | *(२)* | *(३)* | *(४)* |
| १ | रांजणखार डावली | ५३/अ/ब/१ | १.४२.०० |
| २ | रांजणखार डावली | रस्ता लागु गट नं. ५३, ४८ | ०.०२.०५ |
| ३ | रांजणखार डावली | ४८/अ/२ | ०.००.०८ |
| ४ | रांजणखार डावली | ५३/क/२ | ०.०३.७२ |
| ५ | रांजणखार डावली | ५३/क/१ | ०.००.०५ |
| ६ | रांजणखार डावली | ५३/अ | १.४२.३२ |
| ७ | रांजणखार डावली | ४८/अ/१ | १.००.८० |
| ८ | रांजणखार डावली | रस्ता लागु गट नं.४८, ६७ | २.०२.०४ |
| ९ | रांजणखार डावली | ६७ | ०.०७.६४ |
| १० | रांजणखार डावली | ६० | ०.१०.२८ |
| ११ | रांजणखार डावली | ३४ | ०.३०.८४ |
| १२ | रांजणखार डावली | ३३ | ०.२७.३४ |
| १३ | रांजणखार डावली | ७९ | ०.०७.६१ |
| १४ | रांजणखार डावली | ७८ | ०.१७.४५ |
| १५ | रांजणखार डावली | ३२ | ०.२१.६१ |
| १६ | रांजणखार डावली | ७७ | ०.३३.३२ |
| १७ | रांजणखार डावली | ३१ | ०.०४.७८ |
| १८ | रांजणखार डावली | गावठाण | ०.०१.६६ |
| १९ | रांजणखार डावली | १/अ | ०.०६.५८ |
| २० | रांजणखार डावली | २ | ०.०९.२१ |
| २१ | रांजणखार डावली | ३/अ | ०.०१.१४ |
| २२ | रांजणखार डावली | ३/अ/१ | ०.०५.१४ |
| २३ | रांजणखार डावली | ४ | ०.०७.४७ |
| २४ | रांजणखार डावली | २४ | ०.२२.२२ |
| २५ | रांजणखार डावली | २३ | ०.०६.४८ |
| २६ | रांजणखार डावली | ५ | ०.१२.४८ |
| २७ | रांजणखार डावली | २२ | ०.१०.७१ |
| २८ | रांजणखार डावली | ६ | ०.०७.५९ |
| २९ | रांजणखार डावली | १८ | ०.१०.२५ |
| ३० | रांजणखार डावली | १९ | ०.०४.५० |
| ३१ | रांजणखार डावली | २० | ०.०३.०४ |
| ३२ | रांजणखार डावली | २१ | ०.००.२२ |
| ३३ | रांजणखार डावली | ४९ | ०.०७.७९ |
| ३४ | रांजणखार डावली | १७ | ०.१०.०७ |
| ३५ | मिळकतखार | १५४ | ०.०६.६० |
| ३६ | मिळकतखार | १५२ | ०.००.८३ |
| ३७ | मिळकतखार | १५३ | ०.०७.१३ |
| ३८ | मिळकतखार | १०८ | ०.०२.४२ |
| ३९ | मिळकतखार | १०७ | ०.०३.६५ |
| ४० | मिळकतखार | ९१ | ०.०३.९४ |
| ४१ | मिळकतखार | ८९ | ०.०३.९६ |
| ४२ | मिळकतखार | ८८ | ०.०१.४६ |
| ४३ | मिळकतखार | ८४ | ०.०८.५४ |
| ४४ | मिळकतखार | ७६ | ०.०७.४३ |
| ४५ | मिळकतखार | ६४ | ०.००.५४ |
| ४६ | मिळकतखार | ६३ | ०.००.८२ |
| ४७ | मिळकतखार | ६२ | ०.००.६० |
| ४८ | मिळकतखार | २४४ | ०.०३.०५ |
| ४९ | मिळकतखार | २४५ | ०.०१.४५ |
| ५० | मिळकतखार | २४६ | ०.००.७१ |
| ५१ | मिळकतखार | २४७ | ०.०६.२१ |
| ५२ | मिळकतखार | २४८ | ०.००.४६ |
| ५३ | मिळकतखार | २४९ | ०.०७.५३ |
| ५४ | मिळकतखार | ३४१ | ०.१६.७८ |
| ५५ | मिळकतखार | ३४२ | ०.११.१७ |
| ५६ | मिळकतखार | ३४३ | ०.०६.९२ |
| ५७ | मिळकतखार | ३४६ | ०.०४.०३ |
| ५८ | मिळकतखार | ३४७ | ०.०१.६९ |
| ५९ | मिळकतखार | ३४९ | ०.०७.३५ |
| ६० | मिळकतखार | ३५० | ०.०१.६६ |
| ६१ | मिळकतखार | ३५१ | ०.००.९१ |
| ६२ | मिळकतखार | ३५२ | ०.००.९० |
| ६३ | मिळकतखार | ३५४ | ०.०९.२१ |
| ६४ | मिळकतखार | ३५५ | ०.०४.५५ |
| ६५ | मिळकतखार | ५३७ | ०.३४.५७ |
| ६६ | मिळकतखार | २४ | ०.०१.२२ |
| ६७ | मिळकतखार | २३ | ०.००.१२ |
| ६८ | मिळकतखार | २५ | ०.०३.४० |
| ६९ | मिळकतखार | २६ | ०.००.६९ |
| ७० | मिळकतखार | २९ | ०.०२.१२ |
| ७१ | मिळकतखार | ३९ | ०.०३.५५ |
| ७२ | मिळकतखार | ४३ | ०.००.५३ |
| ७३ | मिळकतखार | ४४ | ०.००.५९ |
| ७४ | मिळकतखार | ४५ | ०.०३.२१ |
| ७५ | मिळकतखार | ४९ | ०.०१.२१ |
| ७६ | मिळकतखार | ५० | ०.०१.१७ |
| ७७ | मिळकतखार | ५१ | ०.०१.६८ |
| ७८ | मिळकतखार | ५२ | ०.०४.४९ |
| ७९ | मिळकतखार | ६१ | ०.०५.१६ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सचिन चिवटे)
शासनाचे उप सचिव.

***अनुसुची***

*संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन*

***तालुका : अलिबाग*** ***जिल्हा : रायगड***

| अ.क्र. | गावाचे नाव | गट नंबर/सर्व्हे नंबर | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| *(१)* | *(२)* | *(३)* | *(४)* |
| १ | चौल | ५३९ | ०.०७.३८ |
| २ | चौल | ५५९ | ०.२८.०६ |
| ३ | चौल | ५५८ | ०.१८.३७ |
| ४ | चौल | ५६३ | ०.०१.७० |
| ५ | चौल | ५५७ | ०.४३.६४ |
| ६ | चौल | ५४१ | ०.०९.९१ |
| ७ | चौल | ५४६ | ०.०४.७७ |
| ८ | चौल | ५४२ | ०.०१.०८ |
| ९ | चौल | ५४७ | ०.०३.३२ |
| १० | चौल | ५५६ | ०.१६.८६ |
| ११ | चौल | ५४८ | ०.००.०१ |
| १२ | चौल | ५४९ | ०.२२.२३ |

(पान ६ वर)

(पान ५ वरुन)

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | चौल | ४९६ | ०.०१.४० |
| १४ | चौल | ४९५ | ०.२०.६२ |
| १५ | चौल | ४९७ | ०.१०.७० |
| १६ | चौल | ४९८ | ०.०४.७८ |
| १७ | चौल | ५५० | ०.१५.२४ |
| १८ | चौल | ४२५ | ०.००.१५ |
| १९ | चौल | ४९९ | ०.१५.२९ |
| २० | चौल | ४९३ | ०.०९.८९ |
| २१ | चौल | ४९४ | ०.११.११ |
| २२ | चौल | ४३२ | ०.००.२९ |
| २३ | चौल | ४२८ | ०.०९.४८ |
| २४ | चौल | ४२९ | ०.०४.६४ |
| २५ | चौल | ४३० | ०.०९.६५ |
| २६ | चौल | ४२६ | ०.०७.५६ |
| २७ | चौल | ४०० | ०.२१.२२ |
| २८ | चौल | ४२७ | ०.३६.२४ |
| २९ | चौल | ३९६ | ०.०१.९६ |
| ३० | चौल | ३९९ | ०.१७.८१ |
| ३१ | चौल | ३६९ | ०.००.८४ |
| ३२ | चौल | ३६३ | ०.१६.३९ |
| ३३ | चौल | ३६७ | ०.०३.७० |
| ३४ | चौल | ३६८ | ०.०९.८४ |
| ३५ | चौल | ३६२ | ०.११.४९ |
| ३६ | चौल | ३६० | ०.०९.३५ |
| ३७ | चौल | ३६१ | ०.१०.६० |
| ३८ | चौल | ३३७ | ०.१७.०१ |
| ३९ | चौल | ३२९ | ०.०४.९७ |
| ४० | चौल | ३३६ | ०.०८.३४ |
| ४१ | चौल | ३३० | ०.१८.५८ |
| ४२ | चौल | ३३१ | ०.०८.५४ |
| ४३ | चौल | ३३२ | ०.०६.३४ |
| ४४ | चौल | २६० | ०.२६.१३ |
| ४५ | चौल | २४४ | ०.०६.८६ |
| ४६ | चौल | २४३ | ०.००.६२ |
| ४७ | चौल | २५४ | ०.०१.५० |
| ४८ | चौल | २४५ | ०.२४.०३ |
| ४९ | चौल | २४१ | ०.००.३० |
| ५० | चौल | २४० | ०.११.०५ |
| ५१ | चौल | २४६ | ०.३१.०३ |
| ५२ | चौल | १८४ | ०.०८.३८ |
| ५३ | चौल | १८३ | ०.००.१७ |
| ५४ | चौल | १८१ | ०.०१.९७ |
| ५५ | चौल | १५३ | ०.१५.९४ |
| ५६ | चौल | १४९ | ०.२१.६८ |
| ५७ | चौल | १५० | ०.०७.४४ |
| ५८ | चौल | १९७ | ०.०२.६२ |
| ५९ | चौल | ४३१ | ०.२७.२१ |
| ६० | चौल | २७३८ | ०.०२.५१ |
| ६१ | चौल | १४८ | ०.२६.४५ |
| ६२ | चौल | ३५० | ०.११.६८ |
| ६३ | चौल | ३३८ | ०.०३.५४ |
| ६४ | चौल | ३३९ | ०.१३.४७ |
| ६५ | चौल | ३३५ | ०.२७.७० |
| ६६ | चौल | १९५ | ०.१४.६९ |
| ६७ | चौल | १८९ | ०.०४.२८ |
| ६८ | चौल | १८८ | ०.१५.६६ |
| ६९ | चौल | १८२ | ०.२२.३५ |
| ७० | चौल | १९६ | ०.३४.९३ |
| ७१ | चौल | १५१ | ०.११.१४ |
| ७२ | चौल | १४६ | ०.१२.४० |
| ७३ | चौल | २७४४ | ०.०४.०६ |
| ७४ | चौल | २७३९ | ०.०८.२० |
| ७५ | चौल | २६९० | ०.३१.८७ |
| ७६ | चौल | २७३६ | ०.१५.८० |
| ७७ | चौल | २७३५ | ०.१४.२७ |
| ७८ | चौल | २७२६ | ०.२०.०८ |
| ७९ | चौल | २७३२ | ०.१०.६० |
| ८० | चौल | २७३० | ०.०८.६८ |
| ८१ | चौल | २७२५ | ०.३६.२८ |
| ८२ | चौल | २७२७ | ०.०५.७१ |
| ८३ | चौल | २७२० | ०.४९.५६ |
| ८४ | चौल | २७२२ | ०.००.६४ |
| ८५ | चौल | २७१९ | ०.०२.९१ |
| ८६ | चौल | २७१५ | ०.१३.११ |
| ८७ | चौल | २७१६ | ०.०८.५६ |
| ८८ | चौल | २७१८ | ०.०८.६० |
| ८९ | चौल | २७३१ | ०.०८.५६ |
| ९० | चौल | १५२ | ०.१४.८४ |
| ९१ | चौल | १८७ | ०.१६.५४ |
| ९२ | चौल | २७२४ | ०.०२.९८ |
| ९३ | चौल | २७१७ | ०.३४.१६ |
| ९४ | आगरकोट | रस्ता लागु गट नं. २७१७, १२ | ०.००.७५ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सचिन चिवटे)
शासनाचे उप सचिव.

***अनुसुची***
*संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन*

***तालुका : मुरुड*** ***जिल्हा : रायगड***

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | कोर्लई | ३५ | ०.१६.०१ |
| २ | कोर्लई | ३४ | १.२६.९८ |
| ३ | कोर्लई | ३६ | ०.२२.४५ |
| ४ | कोर्लई | ३२ | ०.०६.०२ |
| ५ | कोर्लई | ३३ | ०.०१.५२ |
| ६ | कोर्लई | ३१ | ०.०५.९२ |
| ७ | कोर्लई | ३० | ०.०२.६६ |
| ८ | कोर्लई | २९ | ०.००.८८ |
| ९ | कोर्लई | २७ | ०.०८.५६ |
| १० | कोर्लई | २२ | ०.२०.५४ |
| ११ | कोर्लई | १९ | ०.०६.३० |
| १२ | कोर्लई | २० | ०.१३.६० |
| १३ | कोर्लई | १८ | ०.०१.७५ |
| १४ | कोर्लई | १७ | ०.१६.७८ |
| १५ | कोर्लई | १२ | ०.२४.६४ |
| १६ | कोर्लई | ४४ | ०.०६.३० |
| १७ | कोर्लई | ७७ | ०.१३.१२ |
| १८ | कोर्लई | ७६ | ०.०९.०८ |
| १९ | कोर्लई | ५२ | ०.०१.३२ |
| २० | कोर्लई | १ | ०.४३.५२ |
| २१ | कोर्लई | २ | ०.१३.८० |
| २२ | कोर्लई | गावठाण | ०.०३.५६ |
| २३ | कोर्लई | ९ | ०.०५.६८ |
| २४ | कोर्लई | १० | ०.१२.६९ |
| २५ | कोर्लई | २१ | ०.०३.७३ |
| २६ | कोर्लई | ११ | ०.०२.३० |
| २७ | कोर्लई | ५८ | ०.११.१६ |
| २८ | कोर्लई | रस्ता लगत गट नं.२०, ३० | ४.७१.७३ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सचिन चिवटे)
शासनाचे उप सचिव.

***अनुसुची***
*संपादित करावयाची उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन*

**तालुका : मुरुड** **जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | भूमापन क्रमांक/गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | उसडी | ३१३ | ०.०७ |
| २ | उसडी | १४९ | ०.१७५ |
| ३ | उसडी | ३३६ | ०.२०१ |
| ४ | उसडी | ३३५ | ०.०९३ |
| ५ | उसडी | ३३७ | ०.०३६ |
| ६ | उसडी | ३३४ | ०.१८६ |
| ७ | उसडी | ३३८ | ०.१२ |
| ८ | उसडी | ३३९ | ०.०४२ |
| ९ | उसडी | ३४० | ०.००४ |
| १० | उसडी | ३६७ | ०.१४६ |
| ११ | उसडी | ३६८ | ०.०६७ |
| १२ | उसडी | ३६९ | ०.०३८ |
| १३ | उसडी | ३७० | ०.१०८ |
| १४ | उसडी | ३४७ | ०.००४ |
| १५ | उसडी | ३४६ | ०.००५ |
| १६ | उसडी | रस्ता लागु गट नं.३४६, ३८७ | ०.०२१ |
| १७ | उसडी | ३८७ | ०.०१५ |
| १८ | उसडी | ३७५ | ०.०५८ |
| १९ | उसडी | ३०६ | ०.००४ |
| २० | उसडी | ३८६ | ०.१२३ |
| २१ | उसडी | ३८४ | ०.११४ |
| २२ | उसडी | ३८३ | ०.०४ |
| २३ | उसडी | ३८२ | ०.१०६ |
| २४ | उसडी | ३८१ | ०.०२ |
| २५ | उसडी | २५९ | ०.००६ |
| २६ | उसडी | ३८० | ०.००४ |
| २७ | टोकेखार | ४ | १.१९.१९ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सचिन चिवटे)
शासनाचे उप सचिव.

**क्र. जिमाका/ रायगड/जाहिरात/१४/७३७/२०२४**

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे.** पगार ७५००-९००० मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- **अलिबाग मधिल ऑफिस** करिता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन,आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- **वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये** काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९७६२७७७९७५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# कोकण मराठी साहित्य परिषदेची वर्षा सहल

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा रोहा-मुरुड-तळा व माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने निवी, रोहा येथील ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र जाधव यांच्या बयोज फार्म या ठिकाणी वर्षा सहलीनिमित्त महाकवी कालिदास दिन अतिशय उत्साहात संपन्न झाला.



सदर कार्यक्रमास कोमसाप जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ, जिल्हा समन्वयक अ.वि.जंगम, गणेश कोळी, दुर्ग अभ्यासक तथा लेखक सुखद राणे, को.म.सा.प.शाखा रोहा अध्यक्षा संध्या दिवकर, माणगाव शाखा अध्यक्ष अजित शेडगे, रोहा शाखा सचिव विजय दिवकर आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते. प्रास्ताविकात रोहा शाखा अध्यक्षा संध्या दिवकर यांनी कार्यक्रमाचे स्वरुप स्पष्ट केले. संजय गुंजाळ यांचे साठ दिव्यांनी औक्षण व शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

जिल्हा युवाशक्ती प्रमुख, गझलकार सिध्देश लखमदे यांनी गुंजाळ सरांवरील स्वरचित कवितेचे उत्तम सादरीकरण केले. यावेळी जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ यांनी अध्यक्षीय मनोगतात गुंजाळांच्या कर्तृत्वाचे अनेक पैलू उलगडून दाखवून त्यांना सदिच्छा दिल्या. यावेळी महाड शाखा अध्यक्ष शाहिर गंगाधर साळवी यांनी मनोगत व काव्य सादर केले. सर्वच वक्त्यांनी आपल्या भाषणात गुंजाळांचे कौतुक करुन जन्म दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी गुंजाळांनी सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करुन आपला जीवनपट मांडताना आपल्या आई-वडिलांचा आवर्जून उल्लेख केला.

पत्नी सायली गुंजाळ यांनीही समयोचित मनोगत व्यक्त केले. दुसऱ्या सत्रात आयोजित कविसंमेलनात तीस कवींनी आपल्या वेगवेगळ्या विषयावर कवितेचे सादरीकरण केले. कविसंमेलनाचे अध्यक्षस्थानी रायगडभूषण सुखद राणे यांनी भूषविले. अभिष्टचिंतन सोहळ्याचे सुत्रसंचालन तळा शाखा अध्यक्ष हेमंत बारटक्के यांनी तर कविसंमेलनाचे निवेदन डॉ. चौधरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहा शाखा सचिव विजय दिवकर व सिध्देश लखमदे यांनी परिश्रम घेतले.

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



आजचे अन्नदाते

**कै. डॉ. सौ. सरोज भास्कर तांबोळी,**
**स्मृतीप्रित्यर्थ, तांबोळी हॉस्पिटल, अलिबाग**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग**
**दागिने-नविन डिझाइन्स**



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहितीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## Walk-in-Interviews

शासकीय तंत्रनिकेतन पेण या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ विषम सत्राकरीता विविध विभागात अभ्यागत अधिव्याख्यात (Visiting Lecturers) यांच्या मुलाखती दिनांक १५ जुलै २०२४ रोजी आयोजित केल्या आहेत. सदर बाबतची सविस्तर माहिती व आवश्यक तो गुगल फॉर्म संस्थेच्या संकेतस्थळावर (www.gppen.ac.in) उपलब्ध आहे.

प्र.प्राचार्य

**शासकीय तंत्रनिकेतन पेण**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज १११/२०२४

**जाहीर नोटीस**

नवाझ अझीम दाखवे,
रा. मु. पो. बोर्ली मांडला, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मांडला, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नवाझ अझीम दाखवे, हिचा जन्म दिनांक १३/१२/१९७३ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे बोर्ली मांडला, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मांडला कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार नवाझ अझीम दाखवे यांचा दिनांक १३/१२/१९७३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजून अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरुड जंजिरा

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज १२६/२०२४

**जाहीर नोटीस**

साबीर अब्दुल्ला टाके,
रा. मु. पो. शिघ्रे, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार साबीर अब्दुल्ला टाके, यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९७० रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे शिघ्रे, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत शिघ्रे कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार साबीर अब्दुल्ला टाके यांचा दिनांक ०१/०६/१९७० रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजून अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरुड जंजिरा

---

**जाहीर नोटीस**

सदर नोटीसीने संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेली सदनिका विद्यमान मालक सौ. सरोज श्रीकांत रानडे, रा. वारजे, पुणे ४११०५८ यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा लेखी करार आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील भूमापन क्रमांक व उपविभाग ५१ हिस्सा नंबर २ प्लॉट नं. ९, क्षेत्र २२०५.५० चौ.मी. या मिळकतीवर बांधलेल्या स्वानंद को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. या 'अ' विंग इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०४, क्षेत्र ९८५ चौ. फूट बिल्टअप ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १५४९/४ असेसमेंट प्रमाणे क्षेत्र ७३९ चौ. फूट ही निवासी सदनिका.**

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-

अलिबाग,
दि. १०.७.२०२४

**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक कार्यालय
अलिबाग समोर, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

---

**जाहीर नोटीस**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर यांचे न्यायालयात**

अर्ज क्रमांक :-४८/२०२४

श्रीम. लिला पोपट पाटील,
रा. शिळ खोपोली, ता. खालापूर — अर्जदार
विरुद्ध
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मुख्याधिकारी, नगरपरिषद खोपोली — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. प्रसाद प्रफुल्ल मोकाशी हे दिनांक ०४/०२/२०२० रोजी मौजे खोपोली ता. खालापूर येथे घरीच आजारामुळे मयत झाले आहेत. ते मौजे खोपोली ता.खालापूर जि. रायगड येथे राहत होते परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद मुख्याधिकारी, नगरपरिषद खोपोली यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, अर्जदार यांनी कै. प्रसाद प्रफुल्ल मोकाशी यांच्या मृत्यूनोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, मुख्याधिकारी, नगरपरिषद खोपोली यांना करावेत त्यासाठी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत कोणत्याही व्यक्तीची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत मे. न्यायालय खालापूर येथे हजर राहून हरकत घ्यावयाची आहे.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे. न्यायालय अर्जदार यांचा अर्ज मंजूर करेल व जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, मुख्याधिकारी, नगरपरिषद खोपोली यांना कै. प्रसाद प्रफुल्ल मोकाशी यांचा मृत्यूदाखला देणेबाबत आदेश करील याची दखल घ्यावी.

आज दिनांक २८/०६/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्यासह दिली.

सही/-
**(आयुब तांबोळी)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज ११२/२०२४

**जाहीर नोटीस**

कैंसर जहान अझीम दाखवे,
रा. मु. पो. हसन अली बिल्डींग, — अर्जदार
मिश्री रोड, डोंगरी मुंबई
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मांडला, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार कैंसर जहान अझीम दाखवे, हिचा जन्म दिनांक १९/०९/१९७० रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे बोर्ली मांडला, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मांडला कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार कैंसर जहान अझीम दाखवे हिचा दिनांक १९/०९/१९७० रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजून अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरुड जंजिरा

---

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. : - ११८/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी साो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. निलम अब्दुल सलाम येलूकर
वय ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा. वडवली, पो. वडवली,
ता. माणगांव, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत वडवली,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी साो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार निलम अब्दुल सलाम येलूकर यांची सासू फातिमा हसनमिया येलूकर ही दि. ११/०७/१९९९ रोजी मौजे वडवली, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. २७/१२/२०२३ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची सासू फातिमा हसनमिया येलूकर ही दि. ११/०७/१९९९ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांची सासू फातिमा हसनमिया येलूकर ही दि. ११/०७/१९९९ रोजी मौजे वडवली, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. ०४/०७/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

---

**जाहीर पेपर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे भुतिवली, ता- कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक सरीता नेहाल धडडा यांनी आमचे अशिलास कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १९ | ६ अ | १.१२.०० | ०.७२ |

सबब वर वर्णन केलेल्या क्षेत्राच्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह हरकत दाखल करावी, वरील देण्यात आलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे आशिल हे जबाबदार राहणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

दिनांक ११/०७/२०२४

**ॲड भारत अंकुश सावंत**
(बी कॉम. एल.एल.बी.)
पत्ता साई सावली अपार्टमेन्ट गाळा नंबर ०५, दिवाणी कोर्टासमोर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

---

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. : - १०३/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी साो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. भागोजी बारकू पवार
वय ५५ वर्षे, धंदा : शेती.
कायमचा पत्ता :- रा. ताम्हणे/गोरेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड — अर्जदार
सध्याचा पत्ता :- कुंभार चाळ,
यशवंत नगर नं. १, गणेश मंदिराच्या मागे
तीन डोंगरी, गोरेगांव वेस्ट, मुंबई- ४००१०४
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत गांगवली,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. भागोजी बारकू पवार यांचा जन्म मौजे ताम्हणे/गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०६/१९६९ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. १०/०५/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे ताम्हणे/गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०६/१९६९ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. भागोजी बारकू पवार यांचा जन्म मौजे ताम्हणे/गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०१/०६/१९६९ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. ०३/०७/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

---

दिनांक ११/०७/२०२४

**नोटीस**

सर्व जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद केलेल्या मिळकती ह्या आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राजेंद्र शांताराम गावंड व सौ. संगीता राजेंद्र गावंड यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

| मौजे | भूमाप क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| परहूर, ता. अलिबाग | १०/१ | क्षेत्र ०-१९-८० पो.ख. ०-०३-५० **एकूण ०-२३-३०** | ४.३७ |
| | १०/२ | क्षेत्र ०-१७-३० पो.ख. ०-०१-१० **एकूण ०-१८-४०** | ४.४६ |
| | ११/१ | क्षेत्र ०-१४-१० पो.ख. ०-०१-९० **एकूण ०-१६-००** | ३.५४ |
| परहूरपाडा, ता. अलिबाग | १६ | क्षेत्र ०-१२ ३० पो.ख. ०-०१-२० **एकूण ०-१३-५०** | २.८६ |

दिनांक :- ११/०७/२०२४

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

**ज.म.र अर्ज १४/२०२४**

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्रीम. प्रज्ञा मनोहर गावंड
रा. मु. सुतार पाडा, पो. कामार्ले — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत चरी,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१. अर्जदार श्रीम. प्रज्ञा मनोहर गावंड यांचा जन्म दि. १२/०६/१९८६ रोजी राहत्या घरी मौजे चरी, ता. अलिबाग, जि.रायगड येथे झाला आहे.
२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चरी कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.
३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत चरी येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत चरी यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. १९/०७/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १९/०७/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

ठिकाण : अलिबाग
तारिख : १०/७/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या परिशिष्ठामधील मिळकतींचे सात बारा अभिलेखामधील भोगवटादार रकान्यामध्ये नमूद असलेल्या श्री. श्याम रामचंद्र किंगर, यांचेकडून परिशिष्ठात नमूद केलेल्या शेती वरकस मिळकती खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतींमधील मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा श्री. श्याम रामचंद्र किंगर यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. परिशिष्ठामध्ये नमूद मिळकतींचे क्षेत्रामध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास परिशिष्ठामध्ये नमूद व्यक्तींचे मिळकतीवरील मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून त्या मिळकतींचा नरेदी व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

**परिशिष्ठ मिळकतींचे वर्णन**
**मौजे कावीर, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | उप विभाग क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर चौ.मिटर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| ४८२ | -- | ००-०७-०० | ०.९८ |
| ४८७ | -- | ००-१४-८० | ४.४५ |
| ४८९ | -- | ००-११-०० | ०.६३ |
| ४९१ | -- | ००-३४-०० | १.९७ |
| ४९४ | -- | ००-२१-०० | १.२१ |
| ४९५ | -- | ००-४४-७० | ९.६३ |
| ४९७ | -- | ००-५०-१० | ११.८१ |
| ४९८ | -- | ००-८५-०० | २०.०१ |
| ५०४ | -- | ०-१४-९० | ३.०६ |
| ५०५ | १ | ००-३१-०० | ६.३४ |
| ५०७ | १ | ००-४१-०० | ९.२५ |
| ५०९ | -- | ००-६०-१० | १४.६९ |
| ५१० | -- | ००-२०-०० | ४.९० |
| ५२८ | १/२ | ००-२९-९० | ६.२१ |
| ५२९ | -- | ००-३३-१० | ७.८२ |
| ५३१ | -- | ००-४५-०० | ११.०९ |

दिनांक :-१०/०७/२०२४

**ॲड. रविंद्र वि.ओक**
'गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

---

**पनवेल महानगरपालिका**
**दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान**
**''जाहीर आवाहन''**

पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती घटित करणेकरीता इतर मंडळ/संघ प्रतिनिधींची निवड करणेबाबत इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत.

या जाहीर आवाहनाद्वारे पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाकडील पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे मधील कलम ३६ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने राजपत्र असाधारण भाग ४-अ, दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी पथविक्रेत्यांबाबत करावयाच्या कार्यवाहीकरिताचे नियम व आदेश शासन राजपत्राद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम ११ ( भाग-२-ख) अन्वये पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समितीवर नामनिर्देशनासाठी विविध मंडळ/संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागवून प्रतिनिधींची निवड करणेकरिता प्रसिद्ध करणेबाबत आदेशित केले आहे.

सदर आदेशान्वये (१) निवासी कल्याण संघ (२ सदस्य), (२) व्यापारी संघ (१ सदस्य), यांचेकडील प्रतिनिधींची निवड करण्यात येईल. सदर संघाकडील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागवून शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम १२ अन्वये खालील नमूद केलेल्या किमान अर्हता निकषाच्या आधारावर सदर संघाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्याचे नामनिर्देशन करण्यात येईल.

१. संघटनेची किंवा संघाची क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२. संघटना किंवा संघ मागील तीन वर्षांचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.
३. संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत.
५.संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा.

जाहीर आवाहन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत (दि.२५/०७/२०२४ अखेरपर्यंत) कार्यालयीन वेळी व दिवशी नमुद संघाकडील इच्छुक व्यक्तींनी नामनिर्देशन अर्ज आवक-जावक विभागास सादर करावेत. तदनंतर पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती सदस्य नेमणूकीकरीता संघातील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज केलेल्या अंतिम उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. सदर अंतिम यादी झाल्यानंतर महानगरपालिकेकडून शासनाच्या आदेशानुसार नगर पथविक्रेता समिती गठीत करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. तरी इच्छुक व्यक्तींनी विहित वेळेमध्ये आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

टिप : नामनिर्देशन पत्र हे महानगरपालिकेच्या डे-एन.यु. एल. एम. विभागाकडून प्राप्त करुन घेणेचे आहेत.

सही/-
**(बाबासाहेब राजळे)**
**उप आयुक्त तथा,**
**शहर प्रकल्प अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/DAY-NUI.M/SUSV/२४२४/प्र.क्र.१/७२/२०२४
दिनांक : १०/०७/२०२४

---

**जाहीर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत मुठवलीतर्फे तळे
ता. माणगाव, जि. रायगड

दिनांक : १०/०७/२०२४

ग्रुप ग्रामपंचायत मुठवलीतर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड
सन २०२०-२१ सन २०२१, २२, २३ सन २०२३-२४ अंतर्गत १५ वा वित्त आयोग विकास कामांचा व साहित्याची निविदा खालीलप्रमाणे

| अ. क्र. | कामाचे नाव/ साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.पं.कडेनिविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व मागासवर्गीय वस्तीमध्ये स्वच्छतेविषयी साहित्य पुरविणे | ६६७३५/- | २००/- | ६६७/- | १९/०७/२०२४ सायं ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| २ | निवी बौद्धवाडी येथे पाण्याची टाकी बसविणे | ५३०२८/- | २००/- | ५३०/- | १९/०७/२० २४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ३ | निवी आदिवासीवाडी येथे हातपंप दुरूस्ती करणे | ५३०३१/- | २००/- | ५३०/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ४ | ग्रा.पं. हद्दीतील इतर कुटुंबांना स्वच्छतेविषयी साहित्य पुरविणे | ६७३१६/- | २००/- | ६७३/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ५ | ग्रा.पं. हद्दीत सोलर दिवे उभारणे | ५४५८२/- | २००/- | ५४६/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ६ | निवी बौद्धवाडी येथे अंतर्गत रस्ता करणे | ६३५४०/- | २००/- | ६३५/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ७ | ग्रा.पं. क्षेत्रात निर्जंतुकीकरणाकरीता स्प्रेईंग मशिन खरेदी करणे | ७००००/- | २००/- | ७००/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ८ | सर्व प्रा. शाळांना स्वच्छताविषयी साहित्य पुरविणे | ५००००/- | २००/- | ५००/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ९ | ग्रा.पं. हद्दीतील मागासवर्गीय वस्तीमध्ये स्वच्छतेविषयी साहित्य पुरविणे | ५००००/- | २००/- | ५००/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| १० | उमरोली-दिवाळी येथील सिद्धेश्वर नगर रस्ता दुरूस्ती करणे | ५७५२१/- | २००/- | ५७५/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| ११ | ग्रा.पं. हद्दीतील मागासवर्गीय वस्तीमध्ये सोलर दिवे बसविणे | १४७९७२/- | २००/- | १४८०/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |
| १२ | मुठवली/रूठे महिला कार्यशाळा दुरूस्ती करणे | ५१९८१/- | २००/- | ५२०/- | १९/०७/२०२४ सायं. ०५.०० वा. | २२/०७/२०२४ सकाळी ११.३० वा. | ३१/३/२०२५ | १५ वा वित्त आयोग |

अटी व शर्ती

१. सदर निविदाबाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके अदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे, ता. माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क ऑर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत मुठवली
ता. माणगाव, जि. रायगड
ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे

## निवडक

### इरफानची हार्दिकवर टीका

**मुंबई :** इरफान पठाणने हार्दिकवर टीका केली होती. आयपीएल २०२४ मध्ये त्याची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. हार्दिकसाठी हा प्रवास खास होता. त्याने टीकेतून स्वतःला यशस्वीपणे सावरले आणि पुनरागमन केले. आयपीएलदरम्यानची कामगिरी चांगली नसल्यामुळे हार्दिकवर टीका करणाऱ्यांमध्ये मीही होतो. त्यावेळी हार्दिकने अनेक चुका केल्या होत्या. इरफान पुढे म्हणाला, तेथून परत येणे आणि विश्वचषक जिंकणे विशेष होते.

### उपांत्य फेरीत आमने-सामने

**नवी दिल्ली :** डॅनिल मेदवेदेव आणि कार्लोस अल्कारेज यांनी आपापल्या उपांत्यपूर्व फेरीतील सामने जिंकून उपांत्य फेरी गाठली आहे. आता दोघेही विम्बल्डनमध्ये सलग दुसऱ्यांदा उपांत्य फेरीत आमने-सामने येतील. गतवर्षी अल्कारेजने या स्पर्धेतील दोन्ही उपांत्य फेरीचे सामने जिंकले होते. मेदवेदेवने उपांत्यपूर्व फेरीत जागतिक क्रमवारीत १० व्या क्रमांकावर असलेल्या यानिक सिनरचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. प्रेक्षकांची उत्कंठा आता ताणली आहे.

### अभिषेक सहायक प्रशिक्षक

**मुंबई :** मुख्य प्रशिक्षकाच्या घोषणेनंतर कोचिंग स्टाफच्या उर्वरित पदांचा शोधही सुरु झाला आहे. बीसीसीआय आता फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण प्रशिक्षकांचा शोध घेत आहे. अभिषेक नायर हे भारतीय संघाचे नवे सहाय्यक प्रशिक्षक बनू शकतात. टी. दिलीप क्षेत्ररक्षण प्रशिक्षक राहू शकतात. गोलंदाजी प्रशिक्षकपदासाठी अद्याप काहीही ठरलेले नाही. बीसीसीआय आणि गंभीर लक्ष्मीपती बालाजी आणि विनय कुमार यांच्या नावांचा विचार करत आहेत. दोघांनी यापूर्वी गंभीरसोबत काम केले आहे.

### युवा खेळाडूंना स्थान

**न्यूझीलंड :** क्रिकेट बोर्डाने केंद्रीय करार जाहीर केला आहे. या नव्या करारात काही दिग्गजांना स्थान मिळालेले नसताना, नव्या आणि युवा खेळाडूंना स्थान मिळाले आहे. रचिन रवींद्रचा यामध्ये प्रथमच समावेश करण्यात आला आहे. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने २० खेळाडूंची यादी जाहीर केली असून त्यात रचिन व्यतिरिक्त बेन सियर्स, विल्यम ओफरुर्के आणि जेकब डफी यांच्या नावाचाही समावेश करण्यात आला आहे. फिरकी गोलंदाज एजाज पटेलचाही या यादीत समावेश करण्यात आला आहे.

### दोन दिग्गजांना घरचा रस्ता

**इस्लामाबाद :** संघाच्या खराब कामगिरीवर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने मोठा निर्णय घेत पाकिस्तान क्रिकेट संघाच्या दोन निवडकर्त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. मात्र, पीसीबीने अद्याप याबाबत अधिकृत घोषणा केलेली नाही. निवड समितीचा भाग असलेला वहाब रियाझ आणि अब्दुल रझाक याला जबाबदारीतून मुक्त करण्यात आले आहे. रज्जाक हा महिला संघाचा निवडकर्ता होता. वहाब हा सुरुवातीला निवड समितीचा अध्यक्ष होता, नंतर तो सात सदस्यांमधील एक होता.

# १२ वर्षांनंतर स्पेन युरो कपच्या अंतिम फेरीत



## फ्रान्सविरुद्ध अवघ्या ४ मिनिटांत केले दोन गोल

### स्पेनच्या १६ वर्षीय खेळाडूने एक गोल करताच युरो कप स्पर्धेत रचला इतिहास

युरो कप २०२४ च्या उपांत्य फेरीत स्पेनने फ्रान्सचा २-१ अशा फरकाने पराभव करत तब्बल १२ वर्षांनी अंतिम फेरी गाठली. फ्रान्सच्या संघाने सामन्याच्या सुरुवातीलाच गोल करत आघाडी मिळवली. एमबाप्पे आणि कोलू मुओनी यांनी युरो कप २०२४ च्या उपांत्य फेरीत ९ व्या मिनिटाला पहिला गोल केला. यानंतर १६ वर्षीय लॅमिने यामलने सामन्यात आपली मोलाची भूमिका बजावली आणि स्पेनकडून एक दणदणीत गोल केला. लॅमिने यामलने २५ यार्डावरून शानदार गोल करत स्पेनला बरोबरी साधून दिली. या गोलमुळे तो युरो चषकाच्या इतिहासात गोल करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. त्यानंतर मैदानावर सहकाऱ्यांनी लॅमिनेचे अभिनंदन आणि कौतुक केले.

**। बर्लिन । वृत्तसंस्था ।**

स्पेनने तब्बल १२ वर्षांनंतर युरो कपच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. मंगळवारी जर्मनीच्या बर्लिनमधील अलियान्झ एरिना येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य फेरीत फ्रान्सचा २-१ असा पराभव केला. स्पेनच्या विजयाचे नायक दानी ओल्मो आणि १६ वर्षीय लॅमिने यामल ठरले आहेत.

आता अंतिम फेरीत स्पेनचा सामना रविवारी इंग्लंड आणि नेदरलँड्स यांच्यात होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य लढतीतील विजेत्या संघाशी होईल. याआधी स्पेनने २०१२ मध्ये इटलीला हरवून अंतिम फेरी गाठली होती. स्पेनच्या विजयाचे नायक हे १६ वर्षीय लॅमिने यामल आणि दानी ओल्मो ठरले. दोघांनी संघासाठी १-१ गोल केला. सामन्याच्या पहिल्या १० मिनिटात एक गोल करून फ्रान्सने आघाडी घेतली होती. मात्र, १५ मिनिटांनंतर स्पेनने पहिला गोल नोंदवून बरोबरी साधली.

सामन्याच्या ७व्या मिनिटाला फ्रान्सचा कर्णधार कायलियन एमबाप्पेने गोल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो गोलपोस्टपर्यंत पोहोचण्याआधीच येशू नव्हासने त्याच्याकडून बॉल हिसकावून घेतला. अवघ्या दोन मिनिटांनंतर, एमबाप्पेकडे बॉल होता. त्याने लगेच बॉल आपल्या सहकाऱ्याकडे पास केला आणि कोलो मुआनीने हेडरने बॉल गोलपोस्टमध्ये मारून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. स्पेनचे फ्रान्सने आघाडी घेतली खरी पण संघ आणि त्याच्या चाहत्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. कारण अवघ्या १५ मिनिटांनी स्पेनने बरोबरी साधली. सामन्याच्या२१व्या मिनिटाला १६ वर्षीय लॅमिने यामलने गोल करत स्कोअर १-१ असा बरोबरीत आणला. बरोबर ४ मिनिटांनंतर म्हणजेच २५ व्या मिनिटाला डॅनी ओल्मोने गोल करून संघाला २-१ ने आघाडीवर नेले.


पूर्वार्धात २-१ ने आघाडीवर असलेल्या स्पॅनिश संघाने फ्रेंच संघावर वर्चस्व राखले. पण सामन्याच्या ६० व्या मिनिटाला फ्रान्सच्या उस्माने डेम्बेलेने क्रॉस शॉट मारून स्कोअर बरोबरीत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचा हा प्रयत्न स्पेनचा गोलरक्षक उनाई सायमनने हाणून पाडला. स्पेनची आघाडी अखेरपर्यंत कायम राहिली आणि स्पेनने हा सामना २-१ अशा फरकाने जिंकला. खेळाडूंनी एकच जल्लोष केला.

# महाराष्ट्र कबड्डी दिनाचे पुरस्कार जाहीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने पुणे येथील शिव छत्रपती क्रीडा संकुल येथे १५ जुलै रोजी होणाऱ्या २४ व्या कबड्डी दिनाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. जळगावच्या मोहन भावसार व पुण्याच्या वासंती सातव-बोर्डे यांना कबड्डीमहर्षी स्व. शंकरराव(बुवा) साळवी कबड्डी जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.





**मोहन भावसार, वासंती सातव-बोर्डे यांना कबड्डी जीवन गौरव**

**सदानंद माजलकर, मधुकर पाटील यांना श्रमयोगी कार्यकर्ता**

**रत्नागिरीच्या रविंद्र देसाई यांना कृतज्ञता पुरस्कार जाहीर**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने सतेज संघ, बाणेर, बाबुराव सोशल फाऊंडेशन, पुणे यांच्या सौजन्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. एशियन कबड्डी स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या भारतीय संघातील महाराष्ट्राच्या स्नेहल साखरे (शिंदे), असलम इनामदार, आकाश शिंदे यांचा देखील खास सन्मान होणार आहे. सदानंद माजलकर (मुंबई उपनगर), मधुकर पाटील (मुंबई शहर), बाळकृष्ण उबाळे (ठाणे) यांना स्व. रमेश देवाडीकर स्मृती श्रमयोगी कार्यकर्ता पुरस्कार, रत्नागिरीच्या रविंद्र देसाई याला कृतज्ञता, तर अहमदनगरचा आदित्य शिंदे व पुण्याच्या आम्रपाली गलांडे यांना अनुक्रमे स्व.मधुसूदन पाटील व स्व. अरुणा साटम पुरस्कार देण्यात येणार आहे. पुण्याच्या भास्कर जोशी यांना ज्येष्ठ पत्रकार, तर स्व. फिदा कुरेशी ज्येष्ठ प्रशिक्षक पुरस्कार बजरंग परदेशी (नंदुरबार), प्रभाकर कदम(पुणे), सतीश गायकवाड (ठाणे), रमेश खवाटे (सांगली), शरद महाडिक (रत्नागिरी) यांना घोषित दिला जाणार आहे.

स्व. बाबाजी जामसांडेकर, स्व. मुकुंद (अण्णा) जाधव व कबड्डी महर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी यांच्या स्मरणार्थ प्रत्येकी रोख ५००० रुपये/-(पाच हजार) शिष्यवृत्ती किशोर मुले रविंद्र माने (नंदुरबार), प्रदीप जाधव (परभणी), सूरज राठोड (बीड).

किशोरी मुलींमध्ये बिदिशा सोनार (नाशिक), मोनिका पवार (जालना), समीक्षा पाटील (नंदुरबार) तर कुमार मुले वैभव रबाडे (कोल्हापूर), साहिल पाटील (कोल्हापूर), जयेश महाजन (नंदुरबार).

कुमारी मुलींमध्ये वैभवी जाधव (पुणे ग्रामीण), समृद्धी मोहिते (मुंबई उपनगर), जुवेरिया पिंजारी (पुणे ग्रामीण). ज्येष्ठ खेळाडू सुनील डकरे (मुंबई शहर), भारत संधाने (उपनगर), सतीश लोभे (लातूर), अनंता शेलार (ठाणे), संजय फडके (अहमदनगर), हिरामण समजिसकर (रायगड), स्मिता देवस्थळी (पुणे), अरुणा जाधव (सांगली) यांना, तर नंदकुमार काळोखे (पुणे), निवृत्ती आजगेकर (मुंबई शहर), रविंद्र म्हात्रे (रायगड), विलास गुजर (रत्नागिरी), सुरेश शेडगे (ठाणे), नरेंद्र लाड (मुंबई उपनगर), सायराबानु शेख (सातारा), जयंत मोरे (सोलापूर), सूर्यकांत देसाई यांना ज्येष्ठ पंच पुरस्कार घोषित झाला आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरचिटणीस बाबुराव चांदेरे यांनी एका परिपत्रकाद्वारे सर्व कळविले आहे.

# जोकोविच प्रेक्षकांवर नाराज

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

टेनिस विश्वातील सर्वांत यशस्वी खेळाडू नोव्हाक जोकोविचने पुन्हा सहज विजयासह विम्बल्डन स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली. मात्र, या वेळी तो विम्बल्डनच्या प्रेक्षकांवर नाराज होता. जोकोविचने सेंटर कोर्टवरील लढतीत होल्गर रुनला अवघ्या दोन तासांत ६-३, ६-४, ६-२ असे हरवले. मात्र, लढतीदरम्यान प्रतिस्पर्धी रुनला मिळणाऱ्या पाठिंब्यावर तो नाराज होता. सामन्यानंतर कोर्टवर बोलताना जोकोविचने आपली नाराजी जाहीरपणे व्यक्त केली. रुनला प्रोत्साहन देण्यासाठी त्याचे चाहते मोठ्याने ओरडत होते. मात्र, एखाद्या व्यक्तीविरुद्ध शेरेबाजी करताना जसे 'बूफअसा आवाज काढला जातो, तसे काहीसे ऐकू येत होते, अशी जोकोविचची भावना झाली होती.



सामन्यानंतर कोर्टवर जोकोविचची मुलाखत घेणाऱ्याने सगळे प्रेक्षक रुनचा जयजयकार करत होते, असे त्याला सांगितले. तेव्हा जोकोविचला राग अनावर झाला. 'मला हे मान्य नाही. ते भलेही रुनला प्रोत्साहित करत असतील, पण तेही मला 'बूफ करण्यासाठीचे एक निमित्त आहे. मी २० वर्षांहून अधिक काळ व्यावसायिक टेनिस खेळत आहे. मला चाहत्यांच्या सर्व युक्त्या माहीत आहेत. मात्र, तुम्ही मला स्पर्श करू शकत नाही,' असे जोकोविच म्हणाला. 'यानंतरही मी प्रेक्षकांचा आदर करतो. खेळ आणि खेळाडू दोघांची प्रशंसा करण्यासाठी ते येथे तिकीट काढून येतात,' असे जोकोविच म्हणाला.

# तायक्वांदो कराटेत पवित्राची सुवर्ण कामगिरी

**खोपोली :** रिलायन्स फाऊंडेशन स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज लोधिवलीमध्ये शिकत असलेल्या पवित्रा राकेश कदम हिने कळंबोली येथे ७ जुलै रोजी झालेल्या २३ व्या राज्यस्तरीय तायक्वांदो कराटे स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळविले आहे. आत्तापर्यंत पवित्रा हिने जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये सलग आठ सुवर्णपदके मिळविली आहेत. या यशाबद्दल संपूर्ण तालुक्यातून तिच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

सर्वत्र ठिकाणी कराटे खेळाचे महत्व पटवून देत तरुणींबरोबर तरुणांना संरक्षणाचे धडे शिकवले जात आहेत. त्यामुळे या खेळाच्या माध्यमातून असंख्य तरुण-तरुणींनी आपल्या स्वःत बरोबर कुटुंबाचे संरक्षण करणे सहज शक्य झाले आहे. तरुणांमधील दडलेल्या कराटे वृत्तीला चालना मिळावी. या दृष्टीने विविध स्तरावर कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. बारामती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पवित्रा कदम हिची निवड झाली असून आतापर्यंत पवित्रा कदम हिने सलग आठ सुवर्ण पदक पटकावले आहेत.

सुभाष पाटील व शैलेश कदम हे पवित्रा कदम हिला कराटेचे प्रशिक्षण देत आहेत. पवित्राच्या यशा बद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. यापुढे देखील तीने देशासाठी खेळून देशासह आपल्या गावाचे नाव उज्वल करावे, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# गौतम गंभीर भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी गौतम गंभीरची भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड झाल्याचे जाहीर केले आहे.

भारतीय क्रिकेट संघाने नुकताच टी-२० विश्वचषकात विजय मिळविल्यानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी आपली निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर बीसीसीआय मुख्य प्रशिक्षकपदाच्या शोधात होती. भारताचा माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर या पदासाठी इच्छुक होता. त्यासाठी त्याने मुलाखतही दिली होती. आता गौतम गंभीरचा कार्यकाळ जुलै २०२४ पासून सुरू होत आहे. तो डिसेंबर २०२७ पर्यंत या पदावर राहिल. कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांकरिता प्रशिक्षकपदाची जबाबदारी त्याच्यावर राहणार आहे. आधुनिक



काळातील क्रिकेट झपाट्याने बदलले आहे आणि गौतम या बदलांचा साक्षीदार राहिला आहे. गौतमने त्याच्या कारकिर्दीत अनेक भूमिका वठविल्या आहेत. त्याने आजवर केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तो यापुढे भारतीय संघालाही पुढे नेईल. असा विश्वास जय शाह यांनी व्यक्त केला आहे.भारत ही माझी ओळख आहे आणि देशाची सेवा करणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा अभिमानाचा क्षण आहे, असे गौतमने म्हटले आहे. भलेही माझ्या डोक्यावर वेगळी टोपी असेल, पण मी आता भारतीय संघाचा पुन्हा एकदा भाग झालो, याचा आनंद वाटतो. प्रत्येक भारतीय नागरिकाला अभिमान वाटेल, असे काम करणे, हेच यापुढेही माझे ध्येय असेल. निळ्या जर्सीतील खेळाडू १४० कोटी जनतेचे स्वप्न आपल्या खांद्यावर घेतात. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला जे काही करता येईल, ते करण्याचा मी प्रयत्न करेन, अशी भावना गौतम गंभीरने व्यक्त केली आहे.

दरम्यान, २९ जून रोजी बार्बाडोसच्या मैदानावर भारतीय क्रिकेट संघाने तब्बल ११ वर्षांनंतर आयसीसी चषक जिंकत मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडला एक उत्तम भेट दिली.

# राहुल द्रविडने बक्षिसाच्या रकमेतील अडीच कोटी रुपये नम्रपणे नाकारले

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाला विजय मिळाल्यानंतर बीसीसीआयने भारतीय क्रिकेट संघ आणि प्रशिक्षक वर्गाला मोठ्या रकमेची बक्षीसं जाहीर केली आहेत. मात्र, राहुल द्रविड याने प्रशिक्षक म्हणून मिळणारा अडिज कोटी रुपयांचा एक्स्ट्रा बोनस घेण्यास नकार दिला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या आयसीसी टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेमध्ये भारतीय संघाने अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत विश्वविजेतेपद पटकावले होते. भारतीय संघाच्या कामगिरीमध्ये मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडने मोलाची भूमिका बजावली होती. एक फलंदाज म्हणून भारतीय संघाला अनेक सामन्यात यश मिळवून देणाऱ्या राहुल द्रविड याने प्रशिक्षक म्हणूनही आपल्या कौशल्याची छाप पाडली. मात्र प्रदीर्घ क्रिकेट कारकिर्दीत अनेकदा यशापयश पचवणाऱ्या राहुल द्रविडचे पाय जमिनीवरच राहिले. त्याचाच प्रत्यय आता भारतीय संघाला टी-२० विश्वचषक स्पर्धेत मिळालेल्या यशानंतर येत आहे. टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाला विजय मिळाल्यानंतर बीसीसीआयने भारतीय क्रिकेट संघ आणि प्रशिक्षक वर्गाला मोठ्या रकमेची बक्षीसं जाहीर केली आहेत. मात्र राहुल द्रविडने प्रशिक्षक म्हणून मिळणारा एक्स्ट्रा बोनस घेण्यास नम्रपणे नकार दिला आहे. बीसीसीआयने टी-२० विश्वचषक विजेत्या संघाला १२५ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

ही रक्कम खेळाडू आणि कोचिंग स्टाफमधील ४२ सदस्यांमध्ये वाटली जाणार होती. १२५ कोटी रुपयांमधून संघातील सर्व १५ सदस्य आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांना प्रत्येकी ५ कोटी रुपये मिळतील. तर कोचिंग स्टाफमधील इतर सदस्यांना प्रत्येकी २.५ कोटी रुपये मिळणार आहेत. टी-२० विश्वचषकामध्ये राहुल द्रविड यांच्यासोबत सपोर्ट स्टाफमध्ये विक्रम राठोड, पारस म्हाम्ब्रे आणि टी. दिलीप यांचा समावेश होता. दरम्यान, राहुल द्रविडने विश्वविजयासाठी मिळणारा एक्स्ट्रा बोनस घेण्यास नकार दिला आहे.

आपल्याला इतर कोचिंग स्टाफला मिळणाऱ्या रकमेएवढीच रक्कम देण्यात यावी अशी मागणी राहुल द्रविड यांनी केली आहे. ते कोचिंग स्टाफमधील इतर सदस्यांप्रमाणेच २.५ कोटी रुपयेच घेतील.



## शरद पवार, एकनाथ शिंदे आणि फडणवीस यांची रणनिती

# एमसीएच्या निवडणुकीसाठी राजकीय फिल्डिंग

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

गेल्या काही दिवसांपासून मुंबई क्रिकेट असोशिएशनच्या अध्यक्षपदाची निवडणूक चर्चेचा विषय बनली आहे. अतिशय प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या एमसीएच्या निवडणुकीत शरद पवार, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि आशिष शेलार यांच्याकडून फिल्डिंग लावली जात आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे यांचं नुकतंच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. त्यामुळे अध्यक्षपदाची जागा रिक्त असून त्यासाठी २३ जुलै रोजी निवडणूक पार पडणार आहे.

आज मुंबई क्रिकेट असोशिएशनच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी काँग्रेसचे नेते नाना पटोले, शिवसेना शिंदे गटाचे आमदार प्रताप सरनाईक यांचे पुत्र विहंग सरनाईक आणि सध्या एमसीएचे सचिवपदी कार्यरत असणारे अजिंक्य नाईक यांनी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे अध्यक्षपदाची निवडणूक आता चुरशीची झाली आहे. यामध्ये कोण बाजी मारणार हे आगामी दिवसात दिसून येईल.

मला आधीपासूनच क्रिकेटमध्ये आवड आहे. त्यात ही निवडणूक लागली. त्यामुळे निवडणूक लढण्याचा निर्णय मी घेतला आहे. या निवडणुकीसाठी जी काही रणनीती लागते, त्यानुसार आमच्याकडे निवडून येण्यासाठी पुरेसे मत आहे. त्यामुळे ही निवडणूक आम्ही जिंकू, असे नाना पटोले यांनी सांगितले. अर्ज भरताना आनंद नाही, अमोलसारखा मित्र गमावलाय. अमोलनं मुंबई क्रिकेटला ज्या उंचीवर नेऊन ठेवलंय, ती उंची अजून वाढवायची आहे, असे अजिंक्य नाईक म्हणाले.

### मुंबई क्रिकेट असोशिएशनं महत्त्व काय?

मुंबई क्रिकेट असोसिएशन म्हणजेच, एमसीएला पूर्वी बॉम्बे क्रिकेट असोसिएशन म्हणून ओळखलं जायचं. ही मुंबई आणि त्याच्या आसपासच्या ठाणे आणि नवी मुंबईसारख्या क्रिकेटची प्रशासकीय संस्था आहे. एमसीएच्या कार्यक्षेत्रात पश्चिम उपनगरामधील डहाणू, मध्य उपनगरातील बदलापूर आणि खारघर तसेच नवी मुंबईचा समावेश आहे. एमसीए मुंबई क्रिकेट संघाचंही संचालन करते आणि मुंबई जिल्ह्यात क्रिकेट स्पर्धा आयोजित करते. एमसीचा मुंबई संघ भारताच्या प्रथम श्रेणी क्रिकेटमधील सर्वात प्रबळ संघ म्हणून ओळखला जातो. मुंबई क्रिकेट संघानं विक्रमी ४१ वेळा रणजी ट्रॉफी जिंकली आहे. विजय मर्चंट, सुनील गावस्कर आणि सचिन तेंडुलकर यांसारखे टीम इंडियाचे दिग्गज खेळाडूही एमसीएच्या संघाकडून खेळले आहेत. मुंबईचा संघ ऐतिहासिकदृष्ट्या बॅटिंग पॉवर हाऊस म्हणून ओळखला जातो.

### भारताला पाच खेळाडूंकडून पदकांची आशा

**नवी दिल्ली :** येत्या २६ जुलैपासून पॅरिस ऑलिम्पिकला सुरुवात होत आहे. ११ ऑगस्ट २०२४ पर्यंत या बहुचर्चित स्पर्धेचा थरार रंगेल. या स्पर्धेत भारताचे प्रमुख पाच खेळाडू वैयक्तिक पदक जिंकतील अशी आशा आहे.

भालाफेकपटू नीरज चोप्रा, महिला पैलवान विनेश फोगट स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही सिंधू, मिराबाई चानूव आणि निखत जरीनकडून तमाम भारतीयांना पदकाची आशा असेल. दरम्यान, टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने सात पदके जिंकली होती. त्यामुळे या खेळाडूंसह अन्य खेळाडूंनी भारतासाठी पदकांची कमाई करावी, अशी आशा आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)